RNI NO. MAHMAR/2020/84035





BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ



उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क मो. 8482839451



शनिवार, ०७ जून २०२५ | वर्ष : ५ | अंक : १६० | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Saturday, 07 June 2025 | Year : 5 | Issue : 160 | Daily | Rate: Rs. 5/-


# राहुल गांधींचा भाजपवर हल्ला

**लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी शुक्रवारी राजगीर येथे पोहोचले. तेथे काँग्रेस कार्यकर्त्यांनी त्यांचे जोरदार स्वागत केले. आंतरराष्ट्रीय कन्व्हेन्शन सेंटरमध्ये संविधान संरक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. तिथे त्यांनी भाजपवर हल्लाबोल केला आणि म्हटले की, एका बाजूला गांधीजींचे विचार आहेत, तर दुसऱ्या बाजूला सावरकर आणि गोडसे यांचे विचार आहेत. हा लढा आजचा नाही, हजारो वर्षे जुना आहे. संविधानात लिहिलेल्या गोष्टी बुद्धांच्या विचारांमधून आल्या आहेत. हीच विचारसरणी आरएसएस संपवू इच्छिते. म्हणून घाबरण्याची गरज नाही. आपल्याला संविधान आणि सत्याचे एकत्र रक्षण करावे लागेल आणि बिहारींशिवाय संविधान वाचवता येणार नाही.**



**पटना :** राहुल गांधी यांनी प्रधानमंत्री मोदींवर हल्लाबोल केला आणि म्हटले की मोदीजींना शरणागती पत्करण्याची सवय आहे. मी आरएसएसशी लढतो आणि मी हे पूर्ण गांभीर्याने सांगत आहे की थोडासा दबाव येताच हे लोक लगेच पत्र लिहू लागतात. आता काळ बदलला आहे, पत्रे नाही, ते व्हॉट्सॲपवर लिहितात. ट्रम्प यांनी 11 वेळा सांगितले की त्यांनी मोदीजींना शरणागती पत्करायला लावली. मोदीजी हे नाकारूही शकत नाहीत, कारण ते सत्य आहे. राहुल गांधी म्हणाले की देशाच्या ९०टक्के लोकसंख्येला दुःखाचा वाटेकरी आहे. सत्तेत आणि निर्णयांमध्ये त्यांचा सहभाग नाही. मला माझ्या देशाचे सत्य जाणून घ्यायचे आहे, म्हणून मला देशाचा एक्स-रे करायचा आहे.

राहुल गांधी यांनी संविधान सुरक्षा संमेलनात पंतप्रधान मोदींवर हल्लाबोल केला आणि म्हटले की पंतप्रधान मोदी म्हणतात की भारतात जात नाही, मग ते स्वतः ओबीसी कसे झाले?



माझे ध्येय जातीय जनगणना आहे. मी संसदेत मोदीजींच्या डोळ्यात डोकावले आणि म्हटले की देशात जातीय जनगणना निश्चितच केली जाईल. तुम्ही लोक गोंधळून जाऊ नका - ते करत असलेली जातीय जनगणना खरी नाही. ज्या दिवशी ते खरी जातीय जनगणना करतील, त्याच दिवशी त्यांचे राजकारण संपेल. राहुल गांधी म्हणाले की जातीय जनगणनेचे दोन मॉडेल आहेत - एक भाजपचा आणि दुसरा तेलंगणाचा. भाजप मॉडेलमध्ये, काही अधिकाऱ्यांनी बंद खोलीत प्रश्न ठरवले. त्या अधिकाऱ्यांमध्ये देशाच्या ९०टक्के लोकसंख्येचा प्रतिनिधी नव्हता.

## गंभीर गुन्ह्यांमध्ये मशीनसारखे जामीन देऊ नका : सर्वोच्च न्यायालय



**नवी दिल्ली :** गंभीर गुन्ह्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये यांत्रिकरित्या अटकपूर्व जामीन मंजूर केला जाऊ नये, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. एका खून प्रकरणातील चार आरोपींना देण्यात आलेला अटकपूर्व जामीन आदेश रद्द करताना न्यायालयाने ही टिप्पणी केली. 1 मे रोजीच्या आदेशात, न्यायमूर्ती विक्रम नाथ, संजय करोल आणि संदीप मेहता यांच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, 'पाटणा उच्च न्यायालयाचा आदेश भारतीय दंड संहितेच्या कलम 302 आणि 307 अंतर्गत अटकपूर्व जामीन मंजूर करण्यासाठी कोणतेही तर्क देत नाही, जे गंभीर गुन्हे आहेत. हा आदेश संक्षिप्त आहे आणि त्यात न्यायालयीन विश्लेषणाचा अभाव आहे. गंभीर गुन्ह्यांच्या प्रकरणांमध्ये अटकपूर्व जामीन मंजूर करण्याच्या अशा यांत्रिक पद्धतीने ते न्याय्य नाही आणि ते रद्द करण्यास पात्र आहे.' एफआयआर आणि संबंधित कागदपत्रांच्या स्पष्ट वाचनावरून न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की अपीलकर्त्यांच्या वडिलांवर अपीलकर्त्यांच्या उपस्थितीत हल्ला करून त्यांची हत्या करण्यात आली. 'रस्त्यात अडथळा आणल्याच्या वादातून ही घटना घडल्याचे दिसून येते. एफआयआरमध्ये नमूद केलेल्या आरोपींच्या विशिष्ट भूमिकांवरून असे दिसून येते की वडील जमिनीवर पडल्यानंतरही त्यांनी हल्ला करणे सुरू ठेवले,' असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, उच्च न्यायालयाने या प्रकरणातील आरोपांचे गांभीर्य आणि स्वरूप समजून घेण्यात 'स्पष्टपणे' अपयश दाखवले आहे. त्यामुळे, आरोपींना आठ आठवड्यांच्या आत आत्मसमर्पण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## ट्रम्प यांच्याशी वाद आणि 152 अब्ज डॉलर्स पाण्यात




**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनामधून उद्योगपती इलॉन मस्क बाहेर पडल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प आणि इलॉन मस्क यांच्यामध्ये वाद सुरू झाल्याचे पाहायला मिळत आहे. मागील काही दिवसांपासून ट्रम्प आणि मस्क हे एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत आहेत, त्यामुळे दोघांमधील मतभेद समोर आले असून अमेरिकेच्या राजकीय वर्तुळात याची चर्चा रंगली आहे. यातच आता इलॉन मस्क यांना डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधात बोलणे चांगलेच महागात पडले आहे. टेस्लाच्या शेअर्समध्ये मोठी घसरण झाली असून इलॉन मस्क यांचे 152 अब्ज डॉलर्सचे नुकसान झाल्याचे वृत्त समोर आले आहे.

## लोणंदच्या बाजारात बोकडांच्या खरेदीसाठी मोठी गर्दी




**सातारा :** बकर ईदच्या पार्श्वभूमीवर लोणंद (ता. खंडाळा) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज भरलेल्या शेळी मेंढी बाजारात 60 हजार बोकडांची विक्रमी आवक झाली होती. 20 हजारांपासून दीड लाख रुपयांपर्यंत बोकडांची खरेदी-विक्री झाल्याने बाजारात 6 कोटी रुपयांची उलाढाल झाल्याचा अंदाज बाजार समितीकडून व्यक्त होत आहे. मुस्लिम बांधवांचा पवित्र बकर ईद सण उद्या (शनिवारी) असल्याने पश्चिम महाराष्ट्रात कांदा व शेळी मेंढी बाजारासाठी राज्यात अग्रगण्य असलेल्या लोणंद कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज भरलेल्या बकरी बाजारात बोकडांची विक्रमी आवक झाली. पहाटेपासूनच सातारा सोलापूर जिल्ह्यातील मेंढपाळ, शेतकरी आपल्या शेळ्या, मेंढ्या व बोकड विविध वाहनांतून बाजार आवारात घेऊन येत होते. कर्नाटकातील हुबळी, धारवाड, मैसूर, बंगळूर, हैदराबाद, विजापूर व गोवा आदी परराज्यातील, तर कोकणातील, महाड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सांगली, सातारा, कोल्हापूर, अहिल्यानगर, बीड, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, पंढरपूर आदी भागांतूनही मेंढपाळ व खरेदीदार येथे आले होते.

## समलैंगिक जोडप्यांना कुटुंब म्हणून राहण्यासाठी लग्नाची आवश्यकता नाही : मद्रास उच्च न्यायालय



**मद्रास :** भारतात समलैंगिक विवाहांना अद्याप कायदेशीर मान्यता मिळालेली नसली तरी, समलैंगिक जोडप्यांना कुटुंब म्हणून राहण्यासाठी लग्नाची आवश्यकता नाही, असा निर्णय मद्रास उच्च न्यायालयाने दिला आहे. एका तरुणीने तिच्या 25 वर्षीय जोडीदाराची सुटका करण्यासाठी दाखल केलेल्या हेबियस कॉर्पस याचिकेला परवानगी देताना न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवले. याचिकाकर्त्या तरुणीच्या जोडीदाराला तिच्या कुटुंबीयांनी जबरदस्तीने कैद केले होते. न्यायमूर्ती जी.आर. स्वामीनाथन आणि व्ही. लक्ष्मीनारायणन यांच्या खंडपीठाने जोडप्याच्या बाजूने निकाल दिला आणि म्हटले की, 'विवाह हा कुटुंब निर्माण करण्याचा एकमेव मार्ग नाही.' 'आमच्या एका विशिष्ट प्रश्नावर उत्तर देताना, कैदेत असलेल्या तरुणीने सांगितले की, ती समलैंगिक आहे आणि रिट याचिकाकर्त्या तरुणीशी ती नातेसंबंधात आहे,' असे न्यायालयाने पुढे नमूद केले.

## विदर्भातील सर्व जिल्हे समृद्धी महामार्गाशी सल्गन?

**नागपूर :** 2014 मध्ये घोषित, 2019 मध्ये पूर्ण होणार म्हणून केलेला संकल्प आणि प्रत्यक्षात 2025 मध्ये पूर्ण झालेला नागपूर - मुंबई (प्रत्यक्षात ठाणे) समृद्धी महामार्गाच्या शेवटच्या टप्प्याचे उद्घाटन गुरूवारी मुख्यमंत्र्याच्या हस्ते पार पडले. विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूरसह अन्य सहा जिल्ह्यांना या महामार्गाचा लाभ होणार आहे. 701 किलोमीटर अंतराच्या या महामार्गामुळे नागपूर - मुंबई हे अंतर आठ तासात कापणे शक्य झाल्याचा दावा सरकारतर्फे करण्यात येत आहे. नागपूर ते शिर्डी या 500 किलोमीटर अंतराचे उद्घाटन डिसेंबर 2022 मध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नागपूरमध्ये झाले. महामार्गाच्या अंतिम टप्प्याचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते इगतपुरी येथे झाले. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वप्नातील महामार्गाची अखे पूर्तता झाली.

## बंगळुरू चेंगराचेंगरीनंतर सिद्धरामय्या यांच्या सचिवांची हकालपट्टी

**बंगळुरू :** रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने आयपीएल जिंकल्यानंतर त्यांच्या विजय उत्सवादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत 11 जणांचा मृत्यू झाला आहे. यानंतर बंगळुरूचे पोलीस आयुक्त आणि काही महत्त्वाच्या पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित केले होते. त्यानंतर आज पुन्हा एकदा कर्नाटक सरकारने मोठी कारवाई केली आहे. कर्नाटक सरकारने राज्याचे मुख्यमंत्री सिद्धारामय्या यांचे राजकीय सचिव के. गोविंदराज यांना पदावरून हटवले आहे. इतकेच नाही तर राज्य गुप्तचर विभागाचे प्रमुखे हेमंत निंबाळकर यांची बदली करण्यात आली आहे.



गोविंदराज यांना त्यांची नोकरी गमवावी लागली कारण, चिन्नास्वामी स्टेडियमच्या बाहेर चेंगराचेंगरी होण्याच्या काही तास आधी बुधवारी सकाळी मुख्यमंत्र्यांच्या घरी झालेल्या एका महत्त्वाच्या बैठकीत पोलीस आयुक्तांनी तीन कार्यक्रमांना नकार दिला होता आणि विजयी मिरवणुकीला परवानगी दिली जाऊ शकत नाही असे म्हटले होते. तरही गोविंदराज यांनी रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूच्या विजयाच्या उत्सवाला परवानगी देण्याची आग्रही मागणी केली होती. मात्र गोविंदराज यांनी पोलीस आयुक्तांकडून विधान सौधा आणि चिन्नास्वामी स्टेडियम या दोन ठिकाणी कार्यक्रम आयोजित करण्यासाठी होकार मिळवला.

## बँकेच्या अधिकाऱ्याने ग्राहकांच्या 'एफडी'मधून उडवले कोट्यवधी!

**कोटा :** बरेच जण मोठ्या कष्टाने कमावलेला पैसा सुरक्षित राहावा म्हणून तो बँकेत ठेवतात. पण आता बँकेत देखील तुमचा पैसा सुरक्षित नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. राजस्थानमधील कोटा येथे एका महिला बँक कर्मचाऱ्याने ग्राहकांचा 4 कोटींहून जास्त रुपयांच्या ठेवी पळवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. धक्कादायक बाब म्हणजे या महिलेने कमी कालावधीत जास्त परतावा मिळवण्याच्या उद्देशाने या महिलेने ही रक्कम शेअर बाजारात गुंतवली. तिने बँकेच्या 41 हून जास्त ग्राहकांचा पैसा यासाठी वापरला. हा घोटाळा जवळपास दोन वर्ष सुरू होता पण बँकेतील कोणालाही याबद्दल कसलीच कल्पना नव्हती.

## ISI मध्ये 'मॅडम एन' ?



**नवी दिल्ली :** पाकिस्तानबरोबर हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली ज्योती मल्होत्रावर भारतात कारवाई करण्यात आली. मात्र, भारतातील ही इन्फ्युअन्सर पाकिस्तानपर्यंत कशी पोहोचली ही बाब धक्कादायक आहे. भारतीय इन्फ्लुअन्सर्सना पाकिस्तानात प्रवेश करण्याकरता मदत करणारी एक महिला केंद्रस्थानी आहे. ती 'जय्याना ट्रॅव्हल अँड टुरिझम' ट्रॅव्हल एजन्सी चालवत असून पाकिस्तानातील प्रसिद्ध व्यावसायिक आहे. नोशाबा शहजाद असे तिचे नाव आहे. ती पाकिस्तानची गुप्तचर संस्था, इंटर-सर्व्हिसेस इंटेलिजेंस (ISI) च्या अंतर्गत काम करत असल्याचंही वृत्त आहे. ढुस्ढ मध्ये 'मॅडम एन' या सांकेतिक नावाने ओळखल्या जाणाऱ्या शहजादने ज्योती मल्होत्रासारख्या भारतीय इन्फ्लुअन्सर्स व्यक्तींना प्रवास करण्यासाठी मदत केली.

ज्योती मल्होत्राची चौकशी सुरू असताना भारतात गुप्तपणे किमान 500 हेर कार्यरत असल्याची माहिती गुप्तचर यंत्रणांना मिळाली. त्यांना स्लीपर सेल नेटवर्कच्या नियोजनात शहजादची महत्त्वाची भूमिका आहे. भारतीय इन्फ्लुअन्सर्सचे ऑपरेशन पाकिस्तानी लष्कर आणि आयएसआयने आखले होते, असे म्हटले जाते. यामध्ये शहजादला हे गुप्त नेटवर्क स्थापित करण्याचे निर्देश देण्यात आले होते. महत्त्वाचे म्हणजे, शहजादचा पती निवृत्त पाकिस्तानी नागरी सेवा अधिकारी आहे, यामुळे तिचे राज्य यंत्रणेशी चांगले संबंध आहेत.

शहजादने भारतीय सोशल मीडियावरील व्यक्तींना पाकिस्तानी लष्करी आणि गुप्तचर संस्थांशी ओळख करून दिली आणि भारतीय हिंदू आणि शीख समुदायांना लक्ष्य केले. गेल्या सहा महिन्यांत, तिने जवळजवळ 3,000 भारतीय नागरिक आणि 1,500 अनिवासी भारतीयांना (एनआरआय) भेटी दिल्याचे सांगितले जाते.

## जगातील सर्वात उंच असलेल्या चिनाब रेल्वे पुल?

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमधील जगातील सर्वात उंच रेल्वे पूल असलेल्या चिनाब पुलाचे आज (6 जून) प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे. हा रेल्वे पूल जम्मू-काश्मीरच्या विकासातील एक क्षण मानला जात आहे. चिनाब नदीवर या पुलाचं बांधकाम करणे मोठ्या प्रमाणात अवघड मानले जात होते. मात्र, तरीही हे आव्हान पूर्ण करत अभियंत्यांनी चिनाब पुलाचे काम यशस्वी पूर्ण केलं आहे. तसेच काही महिन्यांपूर्वी या पुलावरून रेल्वेची पहिली यशस्वी चाचणी देखील पार पडली होती. त्यानंतर आज या पुलाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सरकारच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पापैंकी एक म्हणजे चिनाब पूल प्रकल्प मानला जात होता. या चिनाब पुलाला रेल्वे क्षेत्रातील नाविन्यपूर्ण प्रकल्प म्हणून ओळखले जाते. अभियांत्रिकी चमत्कार मानला जाणारा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प जम्मू आणि काश्मीरच्या विकासात महत्वाची भूमिका बजावणार आहे. माहितीनुसार, चिनाब पुलाच्या दोन्ही बाजूंना झिंकने कोट केलेले आहे. या बहुचर्चित पूलावरून उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लाईन सुरु होईल.

चिनाब पुलाची प्रमुख वैशिष्ट्ये काय आहेत?

प्राप्त माहितीनुसार, चिनाब पुलासाठी 2008 मध्ये करार करण्यात आला



होता. हा चिनाब पूल जम्मूतील बक्कल आणि कौरीतून सुरू होतो आणि कटरा ते बनिहालला जोडतो. हा उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक (यूएसबीआरएल) चा एक भाग आहे. यामागचा उद्देश असा आहे की हवामान बदल आणि इतर नैसर्गिक बदलादरम्यान जम्मू आणि काश्मीरमध्ये कनेक्टिव्हिटी वाढवणे आहे. हा पूल तयार होण्यासाठी तब्बल 14 हजार कोटी रूपयांचा खर्च आल्याचे सांगितले जाते..


मदतनिस पाहिज
सुगतनगर, इंदोरा परिसरातील रहिवासी असणारा एक पदविधर मदतनिस पाहिजे.
पगार ९०००/- रूपये महिना
संपर्क
मो. 7507661569




# राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे एकत्र येणार?

> ठीक आहे, बघुया, जे महाराष्ट्रातील जनतेच्या मनात आहे ते होईल.
> - उद्धव ठाकरे

> महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात आहे ते होईल असे उद्धव ठाकरे म्हणाले, पण महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात 2017 साली देखील काहीतरी होते. त्याआधी 2014 साली देखील महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात काहीतरी होते. मात्र, उद्धव ठाकरे यांच्या मनात नव्हते. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या मनात काय आहे? हे जास्त महत्वाचे आहे. उद्धव ठाकरे यांनी काय म्हटले त्या प्रत्येक गोष्टीवर मी बोलणे योग्य नाही. आता ते काय बातमी देणार आहेत ते मला माहिती नाही. पण ते जर म्हणत असतील तर आपण सर्वजण बातमीची वाट पाहूयात.
> - संदीप देशपांडे

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे एकत्र येणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहेत. या चर्चांचं कारण म्हणजे राज ठाकरे यांनी एका मुलाखतीत बोलताना एक सूचक वक्तव्य केले होते. त्यांच्या वक्तव्यानंतर मनसे आणि ठाकरे गटाच्या युतीच्या चर्चा सुरु झाल्या. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी देखील राज ठाकरे यांच्या वक्तव्याला प्रतिसाद दिला होता. त्यानंतर आज ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलताना एक सूचक विधान केले होते. कदाचित त्या दोघांमध्ये (राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यात) युतीबाबत फोन झालेही असतील असं भाष्य राऊत यांनी केले होते.

दरम्यान, त्यानंतर मनसे नेते अविनाश जाधव यांनी देखील सूचक विधान करत तुम्ही एक पाऊल पुढे या, राज ठाकरे 100 पावले पुढे येतील असे म्हटले होते. त्यानंतर आता खुद्द उद्धव ठाकरे यांनी मनसेशी युती करण्याच्या संदर्भात मोठे भाष्य केले आहे. 'महाराष्ट्राच्या मनात आहे तेच होईल', असे उद्धव ठाकरे यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले आहे. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र कधी येणार? याकडे अवघ्या महाराष्ट्राच लक्ष लागले आहे. साद दिली, प्रतिसादही सकारात्मक आहे.

'तसेच मी तुम्हाला फक्त एका वाक्यात सांगितलं, याबाबत जे काही बारकावे आहेत ते आम्ही पाहात आहोत. तसेच मी तुम्हाला फक्त संदेश नाही तर थेट बातमी देईन. माझ्या शिवसैनिकांच्या मनामध्ये काहीही संभ्रम नाही. त्यामुळे माझं म्हणणं असं आहे की संदेश वैगेरे देण्यापेक्षा जी काही बातमी द्यायची ती आम्ही देऊ, असे सूचक भाष्य उद्धव ठाकरे यांनी केले आहे.

**संजय राऊत काय म्हणाले होते?**

'नेत्यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याने कार्यकर्त्यांचे मनोमिलन सुरू आहे. सहकारी या विषयावर अत्यंत सकारात्मक असल्याने त्याचा परिणाम जमिनीवर कार्यकर्त्यांचं मनोमिलन झाले असेल. अमित ठाकरे आणि आदित्य ठाकरे या मुलांच्या जन्माच्या आधीपासून हे भाऊ आहेत', असे संजय राऊत यांनी आज म्हटले होते.

दरम्यान, आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे यांनी म्हटले होते की या राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्याकडे एकमेकांचे फोन नंबर आहेत. त्यांना युती करायची असेल तर ते एकमेकांना फोन करतील. याबाबत संजय राऊतांना विचारले असता ते म्हणाले, 'या दोघांमध्ये फोन झालेही असतील. तुम्हाला फळ दिसल्याशी कारण आहे ना. युतीच्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. दोन भावांमध्ये प्रस्तावाची गरज नसते', असंही संजय राऊतांनी स्पष्ट केले होते.

**अविनाश जाधव काय म्हणाले होते?**

'दोन्ही भावांकडे एकमेकांचा नंबर आहे, अख्खी शिवसेना म्हणत असेल की उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंबरोबर जायला हवे, तर उद्धव ठाकरेंकडून एक कॉल यावा अशी अपेक्षा आहे. कॅमेऱ्यासमोर बोलणाऱ्या नेत्यांनी उद्धव ठाकरेंशी बोलावे. एक पाऊल पुढे या, राज ठाकरे 100 पावले पुढे येतील', असे अविनाश जाधव यांनी केलं म्हटले होते.


वाचकांना आवाहन
दैनिक बहुजन सौरभची नागपूर शहरात सतत मागणी वाढत आहे. आपल्या घरी जो पेपर देतो. त्यांच्याकडे दैनिक बहुजन सौरभची मागणी करावी. आमच्या वर्तमानपत्राची स्वतंत्र अशी कोणतीही वितरण व्यवस्था नाही.
बहुजन सौरभ
दैनिक बहुजन सौरभ नागपूर शहरात सर्वच पेपर विक्री केंद्रावरती उपलब्ध आहे. याची वाचकांनी नोंद घ्यावी.
मुख्य संपादक
दैनिक बहुजन सौरभ

“ शांतपणे विचार करून घेतलेले निर्णय नेहमी योग्य ठरतात! ”



## संपादकीय

### दै. बहुजन सौरभची वृक्षसंगोपन भूमिका

वृक्ष लागवडीसोबतच संगोपनाचा संकल्प करा असा दैनिक बहुजन सौरभ सर्व पर्यावरणप्रेमी लोकांना आग्रह आहे. पावसाळा आला की अनेक संस्था वृक्ष लागवडीचे संदेश देतात. वृक्षांची लागवडही करतात. त्याचे संवर्धन आणि संरक्षणाकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर ‘वृक्ष लागवड नव्हे तर, वृक्ष जगवा’ हे ब्रीदवाक्य महत्त्वाचे ठरते. दरवर्षी लाखो झाडे लावली जातात, पण त्यातील फार थोडी झाडे मोठी होतात. यामागचे कारण म्हणजे केवळ झाड लावून जबाबदारी संपल्यासारखे वागणे. प्रत्यक्षात झाड लावल्यावर त्याची काळजी घेणे, त्याला पाणी, खत टाकणे, कीड नियंत्रण करणे आणि त्याची योग्य वाढ सुनिश्चित करणे हे आवश्यक आहे. पर्यावरण दिनाच्या निमित्ताने सर्वांनी शपथ घेऊन वृक्षसंगोपनाचा संकल्प करू या! आमचा आग्रह आहे. वृक्ष म्हणजे पर्यावरणाचा श्वास आहे. ते हवा शुद्ध करतात, जमिनीचा धूप थांबवतात, जलस्त्रोत टिकवून ठेवतात आणि विविध प्राण्यांचे घर बनतात. त्यामुळे झाड फक्त लावणे पुरेसे नाही, तर ती झाडे जगवली पाहिजेत. त्यांच्या वाढीची जबाबदारी घेतली पाहिजे. विशेषतः शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती आणि स्वयंसेवी संस्था यांनी वृक्षांचे संगोपन हाती घेतले पाहिजे. ते घेतात हे विशेष उल्लेखनीय आहे. झाडांची देखभाल, आपला वेळ आणि प्रेम द्यावे लागते. एखाद्या जिवाप्रमाणे त्यांची काळजी घेतली तरच ते वाढतील आणि पुढच्या पिढ्यांना शुद्ध हवा, सावली आणि पर्यावरणाचा समतोल मिळेल. त्यामुळे फक्त वृक्षारोपण करून फोटो काढणे आणि प्रचार करणे म्हणजे पर्यावरणरक्षण नव्हे. प्रत्यक्ष कृती म्हणजे झाड जगवणे. या हरितक्रांती मध्ये आपला वाटा फार महत्वाचा आहे. झाडांना सुरवातीच्या काही महिन्यांमध्ये विशेष देखभाल लागते. नियमित पाणी, खत, कुंपण, आणि कीटकांपासून संरक्षण दिल्यासच झाडे मजबूत होऊन वाढते. हे काम कुणीतरी करेल, अशी अपेक्षा न ठेवता प्रत्येकाने स्वतः पुढाकार घेणे गरजेचे आहे. अनेक वृक्ष प्रेमी नागरिकांनी झाडांचे पालकत्व घेतले आहे. ही आनंदाची बाब आहे. वृक्ष ही नुसती वनस्पती नाही, तर ती एक सजीव आहे. झाडांमुळे आपल्याला शुद्ध हवा, पाणी, सावली, फळे, औषधी वनस्पती आणि जैवविविधतेचा आधार मिळतो. झाडे जमिनीतील पाण्याची पातळी टिकवतात, मृदारक्षण करतात आणि हवामान नियंत्रित करतात. त्यामुळे फक्त वृक्षारोपण करून जबाबदारी संपल्यासारखी भावना ठेवणे चुकीचे आहे. त्याऐवजी, लावलेल्या प्रत्येक झाडाला एक ‘पालक’ असावा, वृक्ष वाढ आणि सुरक्षिततेची काळजी घ्या अशी विनंती दैनिक बहुजन सौरभ करीत आहे. शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, ग्रामपंचायती आणि स्थानिक नागरिकांनी मिळून झाडांचे संगोपन केल्यास त्यांचा टिकाव वाढू शकतो. शहरांमध्ये झाडे जास्त प्रमाणात जगण्यासाठी स्थानिक प्रशासनाने सिमेंटचे पदपथ उघडे ठेवणे, झाडांसाठी मोकळी जागा राखून ठेवणे यावर भर दिला पाहिजे. तसेच, झाडांवर माहितीपट लावून त्यांचा प्रकार, उपयोग, आणि लावणाऱ्या व्यक्तीची माहिती लिहून ठेवल्यास लोकांना त्या झाडाशी आत्मीयता वाटू शकते, पर्यावरण वाचवायचे असेल, तर वृक्षारोपणासोबत वृक्षसंवर्धन देखील तितकेच महत्त्वाचे आहे. आपल्या प्रिय व्यक्तींच्या नावे झाडे लावा आणि झाडे जगवा अशी विनंती दैनिक बहुजन सौरभ करित आहे. शहरासह देशात विकासाच्या नावावर सुरू असलेली वृक्षांची कत्तल म्हणजे पर्यावरणाचा ऱ्हास आहे. त्याऐवजी शिक्षण, रुग्णालय या पायाभूत सुविधा द्या परंतु, वृक्षतोडीच्या बदल्यात होणारा विकास नको. न्यायालयात पर्यावरणप्रेमीनी जनहित याचिका दाखल करीत दाद मागितली. न्यायालयाने ‘आधी वृक्षारोपण, मग वृक्षतोड असा आदेश का दिला. यावर शंका निर्माण होते. विकासाला मुळीच विरोध नाही. पण, शहरातील हिरवळ नष्ट करायला नको. वृक्षतोडीवर पर्यायी वृक्षारोपण पर्यायी वृक्षारोपणाचा अभ्यास होणे गरजेचे पर्यावरण स्थिती अहवाल नियमित द्यावा इमारत आराखडा मंजूर करताना उद्यान विभागाला वृक्षांची माहिती द्यावी विकासकामांचा पर्यायी आराखडा विचारात घ्यावा वृक्षांचे स्थलांतरण टाळवे वृक्षारोपणासाठी जागा उपलब्ध करून द्याव्या वृक्ष संवर्धन कायदा पाळवा पर्यावरण मंजुरीशिवाय प्रकल्पाला मंजूरी नको किती वृक्ष जगले याचे आकडे देत राहावे एक झाड तोडते तर परिसरात पाच झाडे लावावी, हा नियम आहे. परंतु, तो पाळला जात नाही, पर्यायी वृक्षारोपण ही धूळफेक आहे. एक डेरेदार वृक्ष प्राणवायू, पक्षांचा उदरनिर्वाह आदी अनेक गोष्टी देतात. मात्र, नवे वृक्ष हे देत नाहीत. व्याघ्र प्रकल्प वाघांचे संरक्षण व्हावे म्हणून विविध प्रकल्प तयार झाले. इतर शहरांमध्ये फोफावलेल्या सिमेंटच्या जंगलांच्या तुलनेत नागपूर हिरवेगार आहे. समृद्धी महामार्ग हिरव्या झाडापासून ओसाड आहे याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. नागपूरच्या विविध चौकातील हिरवाई, रस्त्यांच्या दुतर्फा पसरलेली घनदाट वृक्षराजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, मेडिकल कॉलेज, राजभवन, सेमिनरी हिल, सीताबर्डी किल्ला, गोरवाडा, अभियांत्रिकी महाविद्यालय, हिरवीगार आहे. लोक सहभागातून वृक्ष लागवडीचा उपक्रम राबविण्यावर भर आहे. वनविभागाने आणि स्थानिक स्वराज्य संस्थानी नागरी वस्त्या, सरकारी जागा, रस्त्याच्या दुतर्फा प्रशासन, विविध स्वयंसेवी संस्था; महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत, नागरिक आदींना सहभागी करून घेत वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे आजचे विद्यार्थी भारताचे भविष्य आहे, हे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जागरुकता निर्माण करण्यासाठी त विद्यार्थ्यांचा सहभाग जास्त महत्वाचा आहे. ■ ■

# आरसीबी की ट्रॉफी 11 लोगोंका बली मांगती है

मी 2002 पासुन क्रिकेटबद्दल जानतो. मागील 23 वर्षात जागतिक क्रिकेटमध्ये आलेले चढ-उतार अगदीच नोंदवून ठेवलेत. 2003 च्या वर्ल्डकप फाइनलमध्ये सचिन 4 रनावर आऊट झाला तेंव्हा ढसाढसा रडलो होतो. शेवटी कप गेला आणि माय मरावी एवढे दुःख झाले होते. 2007 ला प्रथमच झालेल्या ट्वेंटी-20 चा आम्ही वर्ल्डकप जिंकला आणि देशाच्या क्रिकेटचे वारे वेगळ्या दिशेला वळले. त्या दरम्यान जागतिक क्रिकेटमध्ये शार्ट फॉर्म लीग बऱ्याच प्रसिद्ध झाल्या होत्या. मग 2008 साली बीसीसीआईचा तत्कालीन सदस्य असलेल्या ललीत मोदी या प्रचंड आर्थिक महत्वाकांक्षा बाळ्गुन असलेल्या फालतु माणसाला आईपीएलची संकल्पना सुचली. त्याने स्पष्ट ओळखले होते की, भारतात राजकारणाव्यतिरिक्त क्रिकेट आणि बॉलीवुड हे दोन असे क्षेत्र आहेत जिथे अमाप पैसा आहे आणि याद्वारे देशातील आर्ध्या अधिक जनतेस मुर्ख बनवले जाऊ शकते. क्रिकेट आणि बॉलीवुडला जर एकमेकांसोबत जोडले तर मोठी आर्थिक उलाढाल करता येईल हे मोदीला पुरते ठाऊक होते. अर्थातच आईपीएलची सुरुवात ही देशातील धनाढ्य लोकांना कायदेशीर सट्टा खेळता यावा म्हणून झाली आणि पहिला आयपीएल सामना 18 एप्रिल 2008 रोजी बॉलीवूड सुपरस्टार शाहरुख खानच्या मालकीचा कोलकाता नाईट रायडर्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळला गेला. ही स्पर्धा प्रचंड यशस्वी झाली, मोठ्या संख्येने प्रेक्षकांना आकर्षित केले आणि लक्षणीय उत्पन्न मिळवून दिले. पुढील तीन वर्षात ही गोम जगभर पसरविण्यात ललीत मोदी यशस्वी झाले. 2014 मध्ये तर अशी परिस्थिती आली होती की वेस्ट इंडीजच्या खेळाडूंना त्यांच्या बोर्डाकडून मिळणाऱ्या वार्षिक मोबदल्यापेक्षा आईपीएल जास्त पैसे देत होती. यामुळे त्या देशातील खेळाडूंनी थेट देशाकडून खेळण्यास नकार दिला होता. मोदी एक मोठी चाल खेळण्याच्या तयारीत गुंतले असताना आईपीएलमध्ये मागच्या दाराने राजकारण सक्रिय झाले होते. 2011 साली केरळच्या एका बड्या नेत्याच्या होणाऱ्या पत्नीस आईपीएलमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या कोच्ची टस्कर केरळ या संघात भगीदारीस मज्जाव करुन मोदीनी खाजवुन घेतले आणि त्याच वर्षी चौकशीचा ससेमीरा बुडाला टोचू नये म्हणून त्याने देशातून पळ काढला. देशाच्या संसदेत या विषयावर प्रचंड घमासान होऊन त्या नेत्यास मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला आणि पुढील तीन वर्षात त्याच्या त्या बायकोचेही रहस्यमय निधन झाले. मोदीने देश सोडला तेंव्हाचा तो देशातील सर्वात मोठा घोटाला असेल. पण आकडेवारी बाहेर आली नाही. प्रचंड कर्जबाजारी झालेल्या बंगळुरू संघाचे मालक असलेले किंगफिशर कंपनीचे सर्वेसर्वा, मद्यसम्राट विजय माल्ल्या यांनी तर देशाच्या अर्थव्यवस्थेची नऊ हजार कोटीची बोळ्वन करून देशातून पळ काढला. दरम्यान 2016-17 मध्ये सीएसके आणि आरआर या दोन संघावर सट्टेबाजी आणि फिक्सिंगच्या आरोपावरून दोन वर्ष बंदी घातली गेली. या प्रकरणाने मात्र 2007 मध्ये ट्वेंटी-20 वर्ल्डकप मध्ये पाकिस्तानच्या मिस्बा उल हकचा झेल घेऊन समस्त भारतीय क्रिकेटप्रेमींना आनंदाची पर्वणी देणाऱ्या एस. श्रीशांत, अजित चंडिला आणि अंकित चव्हाण या खेळाडूंवर बंदी घालण्यात आली आणि या तरुण पोरांची ओजस्वी करकीर्द विचित्र पद्धतीने समाप्त झाली. सीएसके या संघात भागीदारी असलेले गुरुनाथ मय्यपण हे तर सट्टेबाजीत दोषी आढळ्ले होते. या संघाची मालकी असलेल्या इंडिया सीमेंट या कंपनीचे मालक तर बीसीसीआईचे अध्यक्ष रहिले होते. पुढे बीसीसीआईने आईपीएलच्या आयोजनाचे शीर्षक विकने असेल की सामन्याचे प्रसारणहक्क विकने असेल या माध्यमातून अब्जो रुपये जमा केले. मागील 17 वर्षात एकदाही सामान्य कंपनीला आईपीएलचे यजमानपद भुषवता आले नाही. खेळाचा दुराग्रह नाहीच पण सुजान नागरिक म्हणून आम्हाला याची काळी बाजू समजुन घ्यावी लागेल. आईपीएल सट्टेबाजीची ज्वाला देशातल्या गांव खेड्यापर्यंत जाऊन पोहचली आहे. क्रिकेटच्या जुगारात एक करोड रुपये हारलेल्या इंजीनियरच्या पत्नीने आत्महत्या केल्याचे वाचुन प्रचंड अस्वस्थ झालोय. मी नुकताच महाराष्ट्र आणि तेलंगनाच्या सीमावर्ती भागात प्रचंड डोंगरदऱ्यात वसलेल्या भागातील काही गावामध्ये तब्बल 15 दिवस मुक्काम करुन आलो. जिथे मोबाईल नेटवर्क नसते अशा गावातील बरीच तरुण मुले रात्री थेट डोंगरमाथ्यावर जाऊन आईपीएलच्या सट्टेबाजीवर घामाच्या उलट्या करीत असल्याचे पाहिले. प्रचंड दुःख झाले. हा जुगार इथपर्यंत कसा पोहचला, ऑनलाइन पैसे कसे लावायचे. ड्रीम इलेव्हनवर टीम कशी बनवायची याचे ज्ञान यांना कुणी दिले असेल ही सगळी प्रश्न तर अनुत्तीर्ण राहिलीच. पण ही तरुण पीढी एवढी प्रगल्भ आहे तर देशाच्या अर्थव्यवस्थेबद्दल यांना काहीच का माहित नाही, वाढत्या बेरोजगारीबद्दल ही पीढी का अस्वस्थ होत नाही. जागतिक प्रश्नांचे बीज यांच्यापर्यंत का पोहचत नाही. रशिया यूक्रेन युद्धावर ही पीढी का व्यक्त होत नाही. अशा एक ना अनेक संशोधनाच्या विषयाने माझ्या मनात कालवाकालव सुरु केलीय. आता प्रश्न उरतो भावनिकतेचा. माझ्या घरापासुन अगदी हाकेच्या अंतरावर आईसीसीच्या एका माजी अध्यक्षाचे घर आहे. एकदा त्यांच्या घरी जाण्याचाही योग आला. तिथून हाकेच्या अंतरावर भारताचे प्रतिनिधीत्व केलेल्या एका मात्तबर क्रिकेटपटूचे घर आहे. माझ्या एका जवळच्या मित्राचे वडील भारतातल्या एका मोठ्या क्रिकेट असोसिएशनचे सदस्य होते. नागपूरात झालेल्या अनेक अंतरराष्ट्रीय सामान्याच्या व्हीव्हीआयपी पासेस त्या मित्राने मला दिल्या असतील पण मी जाणीवपूर्वक सामना पाहण्यास जाण्याचे टाळत आलोय. खेळावर प्रेम असणे यात काहीच वावगे नाही. पण खेळाच्या प्रेमापोटी आपल्या आयुष्याचा खेळ होणे हा अगदीच वेडेपणा आहे. नुकतीच आईपीएल स्पर्धा समाप्त झाली. आरसीबीने तब्बल 18 वर्षानंतर आपले पहिले वहीले विजेतेपद पटकावले. परंतु तो आनंदोत्सव पहण्यासाठी मैदानात जात असताना 11 क्रिकेटप्रेमींचा मृत्यू होणे हे फार दुर्दैवी तर आहेच. किंबहुना आपल्या देशातील आंधळ्या क्रिकेटप्रेमाला जगापुढे नागडे करणारा तो दिवस होता. आयुष्याला सामोरे जाताना भारतीय तरुण एवढे भावनिक होत असतील तर देशाच्या भविष्यावरच प्रश्नचिन्ह उपस्थित होतात. आरसीबीचा संघ विजेतेपदासाठी 11 लोकांचा बळी मागत होता का? त्या 11 लोकांनी आरसीबीच्या 11 खेळाडूंच्या शौर्य आणि समर्पणासाठी बलिदान दिले आहे का? त्यांच्या कुटुंबाचे आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या लोकांचे भविष्य काय? असे अनेक प्रश्न अनुत्तीर्ण राहतात. विराट कोहली निःसंशय महान खेळाडू आहे. त्यागी आहे, समर्पित आहे. संघ विजयी झाला तेंव्हा त्याचा नयनकडा ओल्या झाल्याचे सर्वांनी पाहिले आहे. पण त्याचे अश्रू एवढेही मौल्यवान नाहीत जे मृत पावलेल्या लोकांच्या कुटुंबाला मिळालेल्या आयुष्यभराच्या अश्रूंच्या आंदनाला पर्याय देऊ शकतील. पतीच्या विजयाने प्रचंड भावनिक झालेल्या त्याच्या पत्नीने आवेगाने त्याला घट्ट मीठी मारल्याचा वीडियो अजुनही सामाजिक संकेतस्थळावर धुमाकूळ घालतोय. निर्विवाद तो त्या पती पत्नीचा व्यक्तिगत प्रेमोत्सव होता. पण अनुष्काने विराटला मारलेली मीठी एवढीही मोहक नव्हती जी त्या 11 घरातील पोरके झालेल्या कितीतरी आलिंगनावर भावनिक फुंकर घालु शकेल. जगातली कोणतीही प्रगत राष्ट्र क्रिकेट खेळत नाहीत म्हणून त्या देशातली तरुण पीढी जगत नाहीय का? मग आपल्या देशातली तरुणाई क्रिकेट म्हणजे देशभक्ती या गोड गैरसमजातून बाहेर का येत नाही. क्रिकेटला प्राण मानुन किंवा धर्म मानुन जगणाऱ्या लोकांना या फसव्या अंधश्रद्धेतून बाहेर यावे लागेल. देश प्रचंड विचित्र परिस्थितीतून जातोय. येणाऱ्या पीढीच्या मूलभत गरजांचे प्राथमिक स्त्रोत उध्वस्त करुन शाश्वत विकासाचे ढोल पिटले जात आहे हे जर आम्हाला ऐकू येत नसेल तर विनाश अटळ आहे. स्वीडनची ग्रेटा थनबर्ग नावाची 16 वर्षाची मुलगी त्या देशाचे पर्यावरण अबाधित राहावे म्हणून फ्राइडे फॉर फ्यूचर या मथळ्याखाली त्या देशाच्या संसदेपुढे आंदोलन करून जगाचे लक्ष्य वेधते. मलाला यूसुफजई पाकिस्तानच्या मुलींना शिक्षण मिळावे म्हणून अंगावर गोळ्या झेलते. लुजैन अल-हथलौल नावाची 35 वर्षाची एक सऊदी महिला अधिकार कार्यकर्ती सऊदी अरबच्या महिलांच्या अधिकारासाठी संघर्ष करतेय, विशेषतः तेथील महिलांना ड्राइविंग लायसन्स मिळावे म्हणून लढतेय, त्यासाठी तुरुंगात जातेय आणि आम्ही महासत्ता किंवा विश्वगुरु होण्याचे पोकळ स्वप्न पाहणारी लोक फोन पे ला दोनशे रुपये उधार मागुन ड्रीम इलेव्हन खेळतोय. हे राष्ट्राच्या प्रगतीच्या दृष्टीने प्रचंड घातक आहे. तुर्तास देशाच्या क्रिकेटचे भविष्य उज्वल व्हावे आणि क्रिकेट खेळणाऱ्या माझ्या देशाचे भविष्य अबाधित राहावे या मापक आशेसह... ■ ■





ॲड.सचिन मेकाले
मो. 9767659551

# बौद्ध अनुयायांनी सोडावे अंधानुकरण



तथागत गौतम बुद्धांनी जाणले की, येथील भारतीय समाज अज्ञान, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा आणि अंधानूकरणाने माखलेला आहे. समाजावर पुरोहित वर्गाचे प्राबल्य आहे. त्यामुळे प्राचीन काळापासून बहुजन समाजावर अन्याय-अत्याचार केला जात होता. पुरोहित वर्गाने स्वतःच्या फायद्यासाठी अनेक प्रकारच्या रूढी- परंपरा, थोतांड बहुजनांवर लादले. त्यांना शिक्षणापासून दूर ठेवले. या अज्ञानामुळे बहुजन समाजाने ते अंधानुकरण हजारो वर्ष नियमितपणे सहन केले. बहुजन समाज त्याचा वाहक झाला. तथागतानी या समाजाची समस्या जाणली. ते त्या समस्येच्या विरोधात उभे राहिले. जो समाज या समस्येने ग्रासलेला होता, तो तथागतांच्या बाजूने उभा राहिला आणि संपूर्ण जम्बुद्वीप बौद्धमय झाला. अनेक राजे, महाराजे सुद्धा आपल्या प्रजेसह बौद्ध अनुयायी झाले. पुरोहितांना कोणी विचारेनासे झाले. पुढे संधी मिळताच पुरोहितांनी प्रतिक्रांती करून, बुद्धाच्या जन्मभूमीतूनच बुद्धाला मुक्त करण्याचा प्रयत्न केला. वैदिक लोकांनी अनेक रूढी, परंपरांना सुरुवात केली. बौद्धांची संस्कृती, त्यांच्या वास्तू, प्रतिमा, प्रतिके यांची नासधूस, तर कधी विकृतीकरण करून वैदिक धर्म भारतीय बहुजन समाजावर लादण्यात ते यशस्वी झाले. हा जो प्रभाव आहे, तो हजारो वर्षांचा आहे. हा प्रभाव आजही आपल्याला धर्मांतरित बौद्ध समाजामध्ये पाहायला मिळतो.

परवा एका प्रसंगी वधू निश्चितीच्या कार्यक्रमाला जाण्याचा योग आला. वर (उपासक) मुलगा घरातून निघताना त्रिशरण पंचशील घेऊन निघायचे होते. तेवढ्यात त्याची आई आली आणि त्याच्या वडिलांना आणि चुलत्यांना म्हणाली की, आधी नारळ काढा. घरच्या देवाला नारळ द्या आणि गाडीच्या पुढे देखील नारळ फोडा. हसावे की रडावे? काही कळत नव्हते. सदर व्यक्तीला समजावून सांगितले, आपण सरळ पंचशील घेऊया आणि घेतलीही; मात्र त्या बाईचे समाधान झाले नाही. माझ्या नकळत त्या बाईने ते कर्मकांड करून घेतलेच.

हळदीच्या प्रसंगीही याची पुनरुक्ती अनेक ठिकाणी होताना दिसते. याचा अर्थ आम्ही नाम के वास्ते बौद्ध झालो की काय? असा प्रश्न निर्माण होतो. धम्मचक्र परिवर्तनाच्या 69 वर्षानंतर ही आमची ही मानसिकता बदलू नये? हे आश्चर्यकारक आहे. ज्या महामानवाने आम्हाला या गुलामगिरीतून बाहेर काढले आणि सोन्याचे दिवस दिले. त्या महामानवाचे अनुयायी म्हणून घेत असताना, अशा प्रकारच्या रूढी, परंपरांचे जर आम्ही अनुकरण करत असु, हे थोतांड अजूनही आम्ही कवटाळत असू तर खरेच आम्ही डॉ. बाबासाहेबांनी सांगितलेल्या मार्गाने, विचाराने जात आहोत का? हे अशी कृती करणाऱ्या प्रत्येकाने आपल्या मनाला विचारावे. आशाकृतीतून आम्ही आमच्या बौद्धिक दिवाळखोरीचे भावनिक प्रदर्शन मांडत आहोत. बऱ्याच वेळा शिकल्या सवरलेल्या महिला देखील देवीच्या हळदीकुंकवासाठी लांबच लांब रांगेत उभ्या असलेल्या दिसतात. काही तर वडाच्या झाडाभोवती फेऱ्या मारताना सुद्धा दिसतात. या स्त्रिया आपली पोकळ डोकी तासन्तास देवापुढे पुण्य प्राप्तीसाठी आदळताना दिसतात. अशा प्रकारे दांभिकपणाचे दर्शन अनेक ठिकाणी आढळते.

एक महाभाग असे मिळाले, धम्म प्रचारासाठी ते अगदी भिक्खू संघाबरोबर फिरत होते. गावोगाव जाऊन बुद्ध, धम्म आणि संघावर बोलत होते. त्यांच्या घरी जाण्याचा योग आला. घरी पाहिले तर धक्काच बसला! हसावे की रडावे? हा प्रश्न निर्माण झाला. कारण त्या व्यक्तीच्या घरात हॉलमध्ये मोठे बुद्धरूप होते; मात्र आतल्या खोलीत देवदेवतांची रांग लागलेली. त्यांच्या पत्नी ते सकाळी उठून कशी पूजाअर्चा करतात? याची मखलाशी करत होत्या. नेमके त्यावेळी ते गृहस्थ घरी नव्हते. तर अशा प्रकारे समाजापुढे जयभीम, जयबुद्ध असे सोंग करून, असे महाभाग आपले डोके या दगडांसमोर आदळताना दिसतात. अशा महाभागानी किमान स्वतःला बौद्ध तरी म्हणू नये. तुम्ही जा पूर्वाश्रमीच्या ठिकाणी होतात, तिथे सुखी रहा; परंतु असा दांभिकपणा, खोटारडेपणा करू नका! समाजाने अशा धूर्त कोल्ह्यांना समाजात स्थान देऊ नये. डॉ. बाबासाहेबांनी अनुप्रवर्तन केले, तेव्हापासूनच खऱ्या अर्थाने आपण अंधारातून प्रकाशाकडे आलो; मात्र या अर्धवट रावांना या प्रकाशाकडून अंधाराकडे जर जायचे असेल तर त्यांना काय म्हणावे? आमचे बांधव इतरांचे सण साजरे करण्यात धन्यता मानत आहेत. विशेषतः दिवाळी, नवरात्रोत्सव!. याचा अर्थ डॉ. बाबासाहेबांनी 22 प्रतिज्ञा देऊनही, आम्ही जे डॉ. बाबासाहेबांनी सोडायला सांगितले ते परत स्वीकारत आहोत. भीतीपोटी ते बाजूला सारण्यास धजावत नाहीत. समाजावर असलेला हा पगडा जाणीवपूर्वक दूर करावा लागेल. यासाठी धम्म बंधू-भगिनींनी ठिकठिकाणी शिबिरे घेऊन, धम्माची आचरण पद्धती समजून घेतली पाहिजे. आपली स्वतःची परंपरा निर्माण करायला हवी. मनुष्य उत्सवप्रिय आहे. उत्सव हे मानवी संस्कृतीचे अविभाज्य भाग असतात. जगात सर्वच ठिकाणी उत्सवांना मानाचे स्थान असते. सण उत्सव हे त्या त्या धर्माशी, धर्म संस्कृतीशी एकरूप झालेले असतात. बौद्ध अनुयायांनी बौद्ध परंपरेतील सण-उत्सव सुरू करावेत. बौद्धांनी आपल्या मनातील विकृतता, नैराश्य झटकण्याचे सामर्थ्य दाखवावे. वैदिकांच्या बौद्धिक गुलामगिरीतून मुक्त होऊन, महामानवाच्या क्रांतीच्या पावलावर पाऊल टाकले पाहिजे. तरच आपले हे वैचारिक आणि धार्मिक पर्यावरणीय प्रदूषण आम्ही दूर करू शकू.

बुद्धाचा विचार हा विवेकावर, चिकित्सेवर, तर्कनिष्ठेवर, विज्ञान निष्ठेवर आणि जागृतीवर अवलंबून आहे. या मार्गानेच सर्वांसाठी पुढील काळ हा उज्वल ठरू शकतो; म्हणून प्रत्येकाने जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात विवेकाची, चिकित्सेची आतिशबाजी करावी. बाहेरील लाखो दिवे पेटवण्यापेक्षा अंतरीचा, एक दीपक पेटवावा. ‘अत्त दीप भव’ हा तथागतांचा संदेश आपले जीवन उजळणार आहे. हा विश्वास स्वतःमध्ये निर्माण करावा. यातच खऱ्या अर्थाने प्रगती आहे.

भारतीय संविधान प्रत्येक धर्माच्या अनुयायाला पूजा, अर्चना, वंदना करण्यास मनाई करत नाही; बौद्ध बांधवांनी आपल्या सण, उत्सवाच्या परंपरा निर्माण कराव्यात. अन्य धर्मीयांचे सण साजरे करू नयेत. ज्या उत्सवांमधून महापुरुषांचे विचार पायदळी तुडवले जात असतील, असे सण उत्सव नाकारलेलेच बरे! तसेच महिला वर्गाने ही भोंदू, साधू, बाबा, बापू यांच्या नादी न लागता विज्ञानाची कास धरावी. मी नीतिमत्ता सोडणार नाही, मी कोणत्याही आमिषाला बळी पडणार नाही, मी माझे जीवन चालवण्यासाठी अनैतिक मार्गाचा अवलंबन करणार नाही. तथागत गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची सांगड घालून आचरण करेन अशी शपथ प्रत्येकाने घ्यावी. ■ ■



किशोर कासारे
मो. 8767425180



# प्रेरणादायी सामुदायिक ‘निकाह सोहळा’

मला आठवते नागपूरात पहिल्यांदा ‘सामुदायीक विवाह सोहळा’ 24-5-1979 मध्ये श्रीगुरूदेव सेवा मंडळ विश्वकर्मा नगर नागपूर द्वारा श्रीगुरूदेव सेवाश्रमात कर्मश्री दुर्गादास रक्षकांनी सुरूवात केला होता. सेवाश्रम तेव्हा आर्थिक अडचणीत होते. विविध जातीचे जोडपे यात सहभागी होते. काही वर्ष हा सामुदायिक विवाह सोहळा चालला. नंतर गरीबातल्या गरीब अशा लोकांना सामुदायिक विवाह सोहळ्यात लग्न लावायला कमीपणा वाटायचा. इज्जतीचा भाजीपाला होईल असे वाटायचे. म्हणजेच कर्ज काढून पैशाची उधळण करीत विवाह करणे याला लोक आजही प्रेस्टीज समजतात. आज तर फोटो अल्बम, डीजे, प्रि वेडींग, इव्हेंट हे तर सोडा फटाक्याचा धूर लाखोचा. सारे काही दिखावा, पैशाचा चुराडा. काय तर म्हणे लग्न एकदाच होते. काय म्हणावे याला मूठभर धनीकांचे अनुकरण मोठ्या मानवी समुहाला त्यात अडकवतात. ‘लोक काय म्हणतील?’ हा गोंडस शब्द ठरलेला. लोक म्हणणारे म्हणतच असतात. पण कर्जाचा डोंगर ज्याचा त्यालाच सांभाळायचा असतो. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ‘वैवाहिक जीवन’ या अध्यायात विवाहातील वाईट चालिरीती, रूढ्यांवर प्रहार करीत विवाह सुटसुटीत, अल्पखर्ची कसे व्हावे यावर चिंतन मांडले आहे. याच नागपूर शहरात व्यावसायिक श्रीमंत अग्रेसन समाज (अग्रवाल मारवाडी समाज) 1985 दरम्यान सामुदायिक विवाह सोहळ्यात आपल्या मुलांची लग्न लावायचे. शाहु समाज पैशाने तसा सदन आजही मोठ्या प्रमाणात सामुदायिक सोहळ्याचे आयोजन करतात. नागपूरात बावणे कुणबी समाज लोक सहभागातून अक्षयतृतीयाला सामुहीक विवाह सोहळा घ्यायचे. तेली समाजात काही वर्षापासून दिवंगत रामूजी वानखेडे ही परंपरा सुरू केली होती. ती आजही सुरू आहे. सामुदायिक विवाह सोहळे जोपर्यंत लोकसहभागातून व्हायचे. तोपर्यंत या सोहळ्यांमध्ये खरच गरीबांची सर्वसामान्य गरजवंत वधू-वरांचे लग्न लागायचे. पण या विवाह संस्काराला शासकीय अनुदानाने आणि राजकीय पुढाऱ्यांनी गालबोट लावले. लग्न झालेली जोडपी शासकीय अनुदान मिळते म्हणून पुन्हा पुन्हा लग्न लावत असल्याच्या चर्चा प्रसिद्धी माध्यमांमधून गाजायला लागल्या. तमाशाचे फळासारखे विवाह समारंभ डीजे, ढोलताशात अडकत जीवनाचा आनंद न ठरता मनोरंजन ठरत आहे. मुहूर्त पाहून ठरलेल्या अनेक विवाहात अशुभ घडतांना आपण पाहतो आहोत. शिकलेल्या तरूणपिढ्या या अंधश्रद्धा आणि अंधरूढ्यांच्या आहारी जाताना दिसतात. हा कुठल्या साधुसंत महापुरूषांचा देश आहे? मी जाणीवपूर्वक हुंड्यासाठी लग्न तुटलेल्या मुलीला पत्नी म्हणून स्वीकारले. वडील दुर्गादासजी यांची इच्छा होती मी खादीच्या कपड्यावर लग्न करावे. नवीन कपडे शिवायला वेळ नव्हता. मी खादीच्या जून्या कपड्यावर लग्न लावले. माझा मुलगा अनंता ज्ञानेश्वर रक्षक याने लग्नात घोडा, फटाके, बँड, डीजेचा धांगडधींगा नाकारला. सरळ मंडपात प्रवेश करीत बहुल्यावर चढला, त्यांनी वाचवलेला खर्चातील पैशाला आम्ही ‘जिव्हाळा’ अरुणाचलच्या पाहाडी भागातील मुलींना शिक्षण देणाऱ्या संस्थेला सुलग्नाच्या पैशासहीत आर्थिक मदत केली. मोठ्या ताजबाग मधील ‘सामुहिक निकाह.’ आमचे मित्र इस्लामचे अभ्यासक आणि सेवाभावी वृद्धाश्रम, धर्मार्थ दवाखाना, अनाथ लोकांचा सांभाळ करणारे मौलाना इर्शाद यांचा फोन आला. 11 मे 2025 ला सामुहीक विवाह सोहळ्यात आपण उपस्थित राहावे. त्यांचे प्रेम आदेशासारखाच आम्ही पाळतो. कारण ‘फैजाने ताजुल औलिया ओल्ड एज होम’ यांचे ठरलेले 786 सभासद आपल्या श्रमाच्या मिळकतीतून अनेक समाज उपयोगी कार्य करतात. आम्ही अल्लाहाची सेवा करतो. त्यांने हे काम आम्हाला सोपवले. हा दृढविश्वासाने हे सेवेचे कार्य चालते. 51 जोडपी विवाहबंधनात अडकली. मुस्लीम रिवाजाप्रमाणे सर्व जोडप्यांनी प्रतिज्ञा घेतल्या. नव वर -वधूंच्या वकिलांनी दोघानांही लग्नाच्या स्वखुशीची सहमती आहे का विचारले. मौलाना सोबत वकील पण असतात. त्याला कायद्याचे बंधन असते. अनेक चांगल्या चालीरितीची सुरूवात या विवाह सोहळ्यात होती. शांततेत प्रत्येक निकाहाचा विधी ऐकायला येत होता. फटाक्याचा आवाज नाही. ढोलताशा आणि डीजेचा कर्कश आवाज नाही. मौलाना इर्शाद म्हणाले हा सर्व दिखावा आम्ही टाळला. प्रत्येक जोडप्यांना संसार थाटण्याच्या महत्वाच्या वस्तु लोकसहभागातून दिल्या. माझा परिचय करून देतांना मौलाना इर्शाद म्हणाले, ‘ज्ञानेश्वरदादा रक्षक हमारे मित्र ही नही तो राष्ट्रसंत तुकडोजी महाराज और संतोके विचारोके अभ्यासक है. मानवता को जोडनेका काम करते है.’ मला त्यांनी शुभेच्छा द्यायला लावल्या. मी म्हणालो, ‘संतमहापुरूषांच्या विचारातून जीवनाकडे पाहण्याचे शिका. सुख-दुःखात तुमची साथ मजबूत असावी. तेच खरे वैवाहीक जीवन. विवाह हा संस्कार आहे मनोरंजन नाही.’

सक्करदरा पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक मुकुंद ठाकरे आणि श्रीगुरूदेव सेवा मंडळाचे रामराव चोपडे यांनी सर्व नवदाम्पत्यांना भावी जीवनाच्या शुभेच्छा देत असे. विवाह समारंभ सर्व जाती-धर्मात संपन्न होऊन समाज जीवनात आदर्श निर्माण व्हायला हवा. हीच काळाची गरज आहे. असे प्रतिपादन केले. मौल्लाना इर्शाद यांनी कुराणाचे दाखले देत मुस्लीम संतांनी दिलेले सुविचार सांगत, ‘वर-वधूंनी परिवारातील वडीलधाऱ्यांचा सन्मान केला तर आपसी प्रेम वाढत. वयोवृद्धांचे अनुभव समजून घेतले की घर स्वर्ग बनते.’ शिस्तीने सर्वांनी आमचे विचार ऐकलेत. एक आगळ वेगळ ‘सामुहीक निकाह सोहळा’ याचा साक्षीदार मला होता आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे ग्रामगीतेतील शब्द मला आठवत होते.

*प्रसन्न हवा, पाणी, ऋतु । हाचि विवाहाचा मुहूर्तु ।*
*बाकीचे झंझट फालतू । समजतो आम्ही ॥ 87॥ ग्रा.अ. 21*
*खर्च नको भव्य मंडपाचा । देखावा असावा निसर्गाचा ।*
*अथवा सभामंडप मंदिराचा । योजावा या कार्यासि ॥ 89॥ ग्रा.अ.21*

खुल्या आकाशात निकाह म्हणजेच विवाह सोहळा संपन्न झाला. असे प्रेरणादायी विवाह सोहळे लोकसहभागातून गावोगावी घडावे. श्रीमंतीचा दिखावा थांबेल. सार्वजनीक अन्नाचा नासोडा थांबेल. अन्न हे मानवी शरीर जगण्यासाठी असते दिखाव्यासाठी नाही. कपड्याच्या फॅशन सारखेच अन्नाचे प्रदर्शन सध्या सुरु आहे. एकीकडे मोठा भारत अन्न, कपडा, निवाऱ्यासाठी संघर्ष करीत आहे. मूठभरांच्या श्रीमंतीचे प्रदर्शन मोठ्या जनसमुदायाला जीवघेणे ठरत आहे. कोण करतील याचे चिंतन? ■ ■



ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक
मो. 9823966282

# शिस्त म्हणजेच श्रीमंती



विनोद उलीपवार
9356249171.

शिस्त हा शब्द एकदम साधा आहे व शिस्त ही अंगी उतरविण्यासाठी साधपणाने जगण्याची व ती अमंलात आणण्याची इच्छा नव्हे तर ‘प्रबळ ईच्छाशक्ती’ची गरज असते. कारण साधे राहणे व साधेपणाने जगणे हे काम सोपे नव्हेतर अत्यंत कठिण काम आहे व त्याचे निर्वाहन हे फक्त आणि फक्त काटेकेरपणे शिस्त पाळणारी व्यक्ती किंवा व्यक्तींचा समूहच करू शकतो. यासाठी शिस्त पाळणारी व्यक्ती किंवा व्यक्तींचा समूह ही त्यांनी स्वतः ठरविलेल्या व स्विकारलेल्या नियम व अटी यांचे काटेकोरपणे (अपवाद वगळता 90 टक्के) पालन व सतत निर्वाहन करण्याचा निर्धारी संकल्प करुन तदनुसार आपले वैयक्तिक व सार्वजनिक जीवन जगणे अनिवार्य असते. असे करणारी व्यक्ती मग ही ‘व्यष्टी’ संबोधल्या जाते व अशा समस्त व्यष्टींचा मिळून जो गट, समूह, संस्था किंवा संघटन बनते त्याला ‘समेष्टी’ संबोधल्या जाते. या विशिष्ट हेतूने एकत्र आलेल्या व्यष्टींनी व्हाल्टेअर यांचे ‘एकत्र येणे ही सुरुवात आहे, एकत्र काम करणे ही गरज आहे व एकत्र टिकणे हे यश आहे’ अशा आशयाचे जे वक्तव्य आहे त्यातच शिस्तीचे प्रचंड फायदे दडलेले आहे. विशिष्ट उद्देश व त्या उद्देशाच्या परिपूर्णतेसाठी पुढाकार घेणारे व्यष्टी (व्यक्ती नव्हे) व त्या व्यष्टीचे विशिष्ट उद्देश साध्य करण्यासाठी ज्या-ज्या व्यष्टी, त्या विशिष्ट उद्देशाच्या पुर्ततेसाठी सोबत येऊन संपर्क, समन्वय व सहकार्य यांचे निर्वाहन काटेकोरपणे करून जी ‘समेष्टी’ निर्माण करतात त्यालाच फौलादी संघटन/संस्था/समूह किंवा गट संबोधल्या जाते. या गटावर अन्य कोणत्याही मानसशास्त्रीय संकल्पना, कल्पना जसे ईश्वर, धर्म, पुरोहित, देवालये व धर्मग्रंथ इत्यादी आणि त्यातील निर्देश यांचा तसूभरही प्रभाव नसतो. कारण निर्माण होणारी ‘समेष्टी’ हिच या लोकांसाठी सर्वकाही असते. या समेष्टीरूपी संघटनेच्या शिस्तीसाठी असलेल्या अटी व नियम यातून जे बळ साकार होते ती प्रबळ अशी शक्ती म्हणून जी ‘समेष्टी’ भौतिक, वास्तविक व मानसिक रूप धारण करत समोर येते ती सर्वप्रकारच्या मानवी अपेक्षा व गरजांची पुर्तता करण्यास निव्वळ सक्षमच नव्हेतर कटिबध्द असते. त्यामुळे ज्या ज्या व्यक्ती या समेष्टीरूपी संघटनेशी, त्या संघटनेने घालून दिलेल्या अटी व नियम यांच्या पालनासाठी कटिबध्द असतात त्यांनाच फक्त ‘व्यष्टी’ संबोधल्या जाते. थोडक्यात जी व्यक्ती एखाद्या संघटनेच्या अटी व नियम यांचे अधीन राहून त्याचे काटेकोरपणे पालन करते अशाच व्यक्ती या आपल्या भोवती संघटनेचे व्यष्टन धारण करतात त्यांनाच फक्त ती समेष्टीरूपी संघटना आपले सभासदत्व बहाल करते त्याच व्यक्ती या ‘व्यष्टी’ ठरतात. संघटित व शिस्तबद्ध प्रयासातून जे यश समेष्टीरुपी संघटनेला हमखास मिळतेच त्याच्या फायद्याचे वाटेकरी हे त्या समेष्टी म्हणजे संघटनेचे सदस्य असलेले व्यष्टी असतात. म्हणून सर्व प्रकारच्या यशाचे व श्रीमंतीचे रहस्य हे समुहवादी शिस्तीत दडलेले आहे व यातून कोणतेही क्षेत्र सूटत नाही. मग ते क्षेत्र आर्थिक असो कि शैक्षणिक, सामाजिक किंवा राजकीय असो. ■ ■



“ विनम्रता आणि अहंकार हे एकत्र कधीच राहू शकत नाहीत... ”



## आपमतलबी

### अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

काही गोष्टीकडे दुर्लक्ष करण्यात आपले हित असते. उदाहरणार्थ असे काही प्रश्न असतात की ज्यांची उत्तरे आपल्याला मिळत नाहीत. कधी कधी मनात हा प्रश्न निर्माण होतो की, ज्या व्यक्ती आपली किंमत करत नाहीत तसेच संकटकाळी दुर पळतात. जे केवळ स्वार्थासाठी आपल्या सोबत असतात. हे असे का व्हावे? समाजात अनेक प्रकारच्या विचारांचे लोक आहेत. त्यांचे कितीतरी अनुभव अनेकांनी कथन केलेले आहेत. सर्वजणांची विचारसरणी एकसारखी नसते. अशाच काही विचारांच्या मंडळीबाबत सांगायचे झाले तर वारा पाहून पाठ फिरवणारी किंवा सरड्यासारखे रंग बदलणारे महाभाग जागोजागी आढळतात. म्हणूनच म्हणतात माणसाची नियत कधी बदलेल याचा काहीही नेम नसतो. माणसांएवढे वेगाने कुणीही बदलत नाही. याऊलट प्राण्यांना मारहाण केली तरी ते साथसंगत सोडत नाहीत. पण माणसांवर जिव ओवाळून टाकला तरी ते स्वार्थासाठी कधी बेईमानी करतील याचा नेम नसतो. एकमुखी रुद्राक्ष अन् माणूस मिळणे फार अवघड आहे. एखाद्याला कितीही मदत केली जरी कालांतराने त्याला त्याचा विसर पडतो. पण जर चुकून मदत केली नाही तर ही गोष्ट तो आयुष्यभर विसरू शकत नाही. स्वार्थी माणूस आपल्या गरजेप्रमाणे समोरच्याचा वापर करीत असतो. पण साधीसरळ व्यक्ती बिचारी या भ्रमात राहते की, ही व्यक्ती आपल्यावर प्रेम करते. आपण याला आवडतो. पुढे हिच गोष्ट त्रासदायक ठरते. म्हणून सावधगीरी बाळगावी लागते.

*लोग संग रहने का, अब मन नहीं बनाते*
*वो घर तो बनाते है, पर आंगन नहीं बनाते.*

कुणी स्तुती केली तर लगेच हुरळून जावू नये. कारण बरेचदा या स्तुतीच्या पुलाखालून स्वार्थाची नदी वाहत असते. असे कितीतरी अनुभव आपल्याला येतात. जसे समोरची व्यक्ती आपल्याला समजून घेत नाही. म्हणून या गोष्टीचा ताण घेता कामा नये. कारण चांगली माणसे अन् पुस्तके फार कमी लोकांना समजतात. जर कुणी आपला अपमान केला तर त्याचा बदला लढाई करून न घेता त्याच्यापेक्षा अधिक सफल होऊन घेता येतो. अशा लोकांचा तिरस्कार करून त्यांची किंमत न वाढवता त्यांना माफ करून त्याला शरमेने मान खाली घालायला भाग पडता येते. आगपेटीतील सर्व काड्या एकसारख्याच दिसतात पण काही काड्या समईची ज्योत पेटवतात तर काही काड्या घरे पेटवतात. ■ ■

# त्याग आणि बलीदानाचा सण




ईद-उल-अजहा किंवा बलिदानाची ईद हा एक मुस्लिम सण आहे. हा सण जगभर साजरा केला जातो. या दिवशी कुराणमधील बळीची घटना साजरी केली जाते. याच दिवशी अल्लाच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी पैगंबर इब्राहिमांनी आपला मुलगा इस्माईलचा बळी देण्याच्या इच्छेचा सन्मान केला. इब्राहिम आपल्या मुलाचे बलिदान देत होते. तथापि, अल्लाहने त्यांना एक कोकरू प्रदान केले. जो त्यांनी त्यांच्या मुलाच्या जागी बळी द्यायचे होता कारण त्यांनी अल्लाहच्या नावाने स्वतःच्या मुलाचे बलिदान देण्याची इच्छा दर्शविली होती. या हस्तक्षेपाच्या स्मरणार्थ प्राण्यांचा विधीपूर्वक बळी दिला जातो. त्यांच्या मांसाचा काही भाग प्राणी अर्पण करणारे कुटुंब वापरतात, तर उर्वरित मांस गरीब आणि गरजूंना वाटले जाते. मिठाई आणि भेटवस्तू दिल्या जातात, लहान मुलांना भेटवस्तू किंवा पैसे दिले जातात आणि विस्तारित कुटुंबातील सदस्यांना भेट दिली जाते आणि त्यांचे स्वागत केले जाते. या दिवसाला कधीकधी महान ईद देखील म्हटले जाते. हा सण कुर्बानीचा सण किंवा पवित्र हज यात्रेचा सण म्हणूनही ओळखला जातो. बलिदानाचा सण हिजरीच्या शेवटच्या महिन्यात, झु-अल-हज मध्ये साजरा केला जातो. जगभरातील मुस्लिम या महिन्यात सौदी अरेबियातील मक्का येथे एकत्र येऊन हज साजरा करतात. या दिवशी ईद-उल-अजहाही साजरी केली जाते. खरे तर हा हजचा एक भाग आणि मुस्लिमांच्या भावनांचा दिवस आहे. जगभरातील मुस्लिमांचा एक गट मक्का येथे हज करतो, जो उर्वरित मुस्लिमांसाठी आंतरराष्ट्रीय भावनांचा दिवस बनतो. ईद-उल-अजहा चा शाब्दिक अर्थ त्यागाची ईद आहे, या दिवशी एखाद्या प्राण्याचा बळी देणे हा एक प्रकारचा प्रतिकात्मक बलिदान आहे.

हज आणि त्याच्याशी संबंधित विधी हजरत इब्राहिम आणि त्यांच्या कुटुंबाने केलेल्या कार्याची प्रतिकात्मक पुनरावृत्ती आहे. हजरत इब्राहिम यांच्या कुटुंबात त्यांची पत्नी हाजरा आणि मुलगा इस्माईल यांचा समावेश होता. असे मानले जाते की हजरत इब्राहिमला एक स्वप्न पडले होते ज्यात ते आपला मुलगा इस्माईलचा बळी देत होते, हजरत इब्राहिम आपल्या दहा वर्षाच्या मुलगा इस्माईलला देवाच्या मार्गावर बलिदान देण्यासाठी निघाले. देवाने त्याच्या देवदूतांना पाठवून इस्माईल ऐवजी एका प्राण्याचा बळी देण्यास सांगितले, असा उल्लेख पुस्तकांमध्ये आहे. वास्तविक इब्राहिमकडून मागितलेला खरा त्याग हा त्याचाच होता, तो म्हणजे स्वतःला विसरून जा, म्हणजे आपले सुख-सुविधा विसरून स्वतःला मानवतेच्या सेवेत पूर्णपणे झोकून द्या. मग त्यांनी आपला मुलगा इस्माईल आणि आई हाजरा यांना मक्केत स्थायिक करण्याचा निर्णय घेतला. पण मक्का त्याकाळी वाळवंट होता,त्यांना मक्केत स्थायिक केल्यानंतर ते स्वतः मानवसेवेसाठी बाहेर पडले. अशाप्रकारे वाळवंटात स्थायिक होणे हा त्याचा आणि त्याच्या संपूर्ण कुटुंबाचा त्याग होता. इस्माईल मोठा झाल्यावर एक काफिला तिथून निघून गेला आणि इस्माईलचा त्या काफिल्यातील एका तरुणीशी विवाह झाला, त्यानंतर वंश सुरू झाला. ज्यांना इतिहासात इस्माईल किंवा वानू इस्माईल म्हणून ओळखले जाते. हजरत मुहम्मद साहेब यांचा जन्म याच घराण्यात झाला. ईद-उल-अजहाचे दोन संदेश आहेत, पहिला - कुटुंबातील ज्येष्ठ सदस्याने स्वार्थाच्या पलीकडे जाऊन मानवी उन्नतीसाठी स्वतःला गुंतवून घेतले पाहिजे. ईद-उल-अधा एका लहान कुटुंबात कसा नवीन अध्याय लिहिला गेला याची आठवण करून देतो. या दिवशी मशिदींमध्ये मोठ्या संख्येने मुस्लिम एकत्र येतात. लाखो मुस्लिम पांढरे कुर्ता घालून ईदगाह किंवा मोठ्या मशिदीत ईदची नमाज अदा करतानाचे दृश्य खूप आनंददायी असते. नमाज अदा केल्यानंतर उंट, बकरी, खेचर, मेंढ्या इत्यादी चार पायांच्या प्राण्यांची कुर्बानी दिली जाते. या दिवशी मुस्लिम त्यांचे नवीन किंवा आवडते कपडे घालतात. महिला शॉर्टब्रेड कुकीजसह विशेष पदार्थ बनवतात. त्या कुटुंब आणि मित्रांसोबत एकत्र येतात. या दिवशी ईदची नमाज एकत्रितपणे अदा केली जाते. नमाज



प्रविण बागडे
9923620919

जमवण्यात महिलांचा सहभाग समुदायानुसार वेगवेगळा असतो. यात दोन भाग असतात, पहिल्या भागामध्ये सात तकबीर तर दुसऱ्या भागामध्ये पाच तकबीर असतात. शिया मुस्लिमांसाठी, सलात अल-ईद पाच दैनंदिन प्रार्थनेपेक्षा वेगळी असते. कारण दोन्ही ईदच्या नमाजांसाठी इश्ना किंवा इकामा स्पष्टपणे केला जात नाही. नमाजानंतर इमाम उपदेश देतात. नमाज आणि उपदेशांच्या शेवटी, मुस्लिम एकमेकांना मिठी मारुन 'ईद मुबारक' म्हणत शुभेच्छा देत भेटवस्तूंची देवाणघेवाण करतात. अनेक मुस्लिम याप्रसंगी त्यांच्या गैरमुस्लिम मित्रांना, शेजारी, सहकारी आणि वर्गमित्रांना त्यांच्या ईद उत्सवात आमंत्रित करतात. जेणेकरून त्यांना इस्लाम आणि मुस्लिम संस्कृतीची चांगली ओळख करून दिली जाते. इस्लामिक मान्यतेनुसार, बकरी ईदची नमाज ही दोन रकातची नमाज आहे, जी अजान आणि इकमतशिवाय जमावाने अदा केली जाते. या नमाजात अधिक तकबीर आहेत, सहसा पहिल्या रकातमध्ये 6 आणि दुसऱ्या रकातमध्ये 5, जरी वेगवेगळ्या इस्लामिक पंथांमध्ये ही संख्या थोडी वेगळी असू शकते. नमाजानंतर इमाम प्रवचन देतो, जे ऐकणे सुन्नत मानले जाते. मुस्लिमांना या दिवशी चांगले कपडे घालण्याचा, सुगंधी अत्तर लावण्याचा आणि मोकळ्या मैदानात किंवा मोठ्या मेळाव्यात नमाज अदा करण्याचा सल्ला दिला जातो. ईद-उल-अजहा दरम्यान लोकांना मांस वाटणे, ईदच्या पहिल्या दिवशी ईदच्या नमाजपूर्वी आणि ईदच्या तीन दिवसांत नमाजानंतर तकबीर म्हणणे हे या महत्त्वाच्या इस्लामिक सणाचे आवश्यक भाग मानले जातात. ईदगाह किंवा मशीद नावाच्या खुल्या वक्फ मैदानावर मोठ्या मेळाव्यात ईदची नमाज अदा करण्यासाठी पुरुष, महिला आणि मुले यांनी त्यांचे उत्तम कपडे परिधान करावेत अशी अपेक्षा असते. ज्यांना परवडणारे श्रीमंत मुस्लिम त्यांचे सर्वोत्तम हलाल पाळीव प्राणी, सहसा गाय, कुर्बानी देऊ शकतात, परंतु प्रदेशानुसार उंट, बकरी किंवा मेंढी, इब्राहीमच्या एकुलत्या एका मुलाची बलिदान देण्याच्या इच्छेचे प्रतीक म्हणून. बलिदान दिले जाणारे प्राणी ज्याला अधिया म्हणतात, ज्याला पर्शियन-अरबी शब्द कुर्बानी देखील म्हणतात, विशिष्ट वय आणि गुणवत्तेचे मानक पूर्ण करावे लागतात. अन्यथा तो प्राणी अस्वीकार्य बलिदान मानला जातो. एकट्या पाकिस्तानमध्ये 2.0 अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त किंमतीचे अंदाजे दहा दशलक्ष प्राणी ईदच्या दिवशी बलिदान दिले जातात. बलिदान दिलेल्या प्राण्याचे मांस तीन भागांमध्ये विभागणे पसंत केले जाते. एक तृतीयांश कुटुंबात अबाधित राहते आणि एक तृतीयांश नातेवाईक, मित्र आणि शेजाऱ्यांना दिले जाते आणि उर्वरित एक तृतीयांश गरीब आणि गरजूंना दिले जाते. आज या प्रसंगी सर्व मुस्लिम बंधू आणि भगिनींना ईद-उल-अजहाच्या हार्दिक शुभेच्छा! ■ ■

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू अर्थात आरसीबी संघाने अठरा वर्षात पहिल्यांदाच आयपीएलचा करंडक उंचावल्यानंतर देशभर सुरू झालेल्या जल्लोषाचे 24 तासाच्या आत शोकसागरात रूपांतर झाले. आरसीबीचा संघ पहिल्यांदाच आयपीएल विजेता ठरल्यानंतर त्या संघाचे स्वागत आणि अभिनंदन करण्यासाठी बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर मोठा समारंभ आयोजित करण्यात आला. अर्थात आपला संघ विजेता ठरल्यानंतर अशा प्रकारचा स्वागत समारंभ आयोजित करण्याची ही पहिली वेळ नाही. याआधीही असे अनेक स्वागत समारंभ आयोजित करण्यात आले होते. मात्र या स्वागत समारंभादरम्यान जी चेंगराचेंगरी होऊन दुर्घटना घडली.**




# जल्लोषाचे रूपांतर शोकसागरात !

तशी दुर्घटना याआधी कधीही घडली नाही. या दुर्घटनेत 11 निष्पाप क्रिकेट चाहत्यांना आपला जीव गमवावा लागला, तर 30 हून अधिक क्रिकेट चाहते गंभीर जखमी झाले. या दुर्घटनेनंतर बंगळुरूमध्येच नाही तर संपूर्ण क्रिकेट विश्वात शोककळा पसरली. मन हेलावून टाकणाऱ्या या दुर्घटनेनंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले. मंगळवारी मध्यरात्री आयपीएलचा अंतिम सामना पार पडल्यानंतर 24 तासाच्या आत असा समारंभ घेण्याची गरज होती का? हा समारंभ आयोजित करताना आयोजकांनी पुरेशी तयारी केली होती का? अवघ्या 24 तासाच्या आत इतक्या मोठ्या समारंभ आयोजित करताना आयोजकांनी प्रशासनाही पोलिसांशी चर्चा केली होती का? हा समारंभ चिन्नास्वामी स्टेडियमवर आयोजित करण्यात आला. या स्टेडियमची क्षमता 35 ते 40 हजार इतकी आहे. प्रत्यक्षात या समारंभासाठी त्याच्या दहा पट म्हणजे अडीच ते तीन लाख क्रिकेट चाहते जमा झाले. या समारंभाला अपेक्षेपेक्षा अधिक चाहते जमा होतील असा अंदाज आयोजकांना आला नाही का? आला असेल तर मग त्यांनी त्यांना नियंत्रित करण्यासाठी काय उपाययोजना केल्या? गर्दी नियंत्रित करण्यासाठी पुरेशे पोलिस बळ होते का? हा समारंभ म्हणजे केवळ इव्हेंट होता का? या समारंभाच्या आडून राजकीय स्वार्थ साधला जाणार होता का? आणि सगळ्यात शेवटचा आणि महत्वाचा प्रश्न या दुर्घटनेत ज्या निष्पाप 11 क्रिकेट चाहत्यांचा बळी गेला त्याला जबाबदार कोण? आयोजक, कर्नाटक सरकार की स्वतःचा जीव धोक्यात घालणारे अतिउत्साही क्रिकेट चाहते? आता या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी एखादा आयोग नेमला जाईल. या आयोगाला या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी काही महिन्यांचा अवधी दिला जाईल. तोवर मृतांच्या आणि जखमींच्या कुटुंबियांना काही लाखांची भरपाई दिली जाईल. राजकारणी नेहमीप्रमाणे एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करून राजकीय पोळी भाजून घेतील. मात्र मूळ प्रश्न तसाच बाजूला राहील त्यावर कोणीही बोलणार नाही. मुळात दुर्घटना घडून गेल्यावर त्याची चौकशी करण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. आपण आजही गर्दीचे व्यवस्थापन करण्यात कमी पडतो हे मान्यच करावे लागेल. क्षमतेपेक्षा अधिक गर्दी उसळली की त्यांचे नियंत्रण करण्यात प्रशासन अपयशी ठरते हे याआधीही अनेकदा सिद्ध झाले आहे. गर्दीचे व्यवस्थापन करण्यात आपण कमी का पडतो? याचा प्रशासनाने अभ्यास करावा. परदेशात गर्दीचे व्यवस्थापन कशा प्रकारे केले जाते याचा अभ्यास करण्यासाठी शासनाने अधिकाऱ्यांना परदेशात पाठवावे. भारतीय लोक उत्सव प्रिय आहेत.



श्याम ठाणेदार, पुणे
9922546295

विशेषतः तरुणांना उत्सवात सहभागी होण्याची फार हौस असते. याच हौसेतून गर्दी वाढत जाते आणि अशी दुर्घटना घडते. नागरिकांनी आपल्या उत्साहाला आवर घालण्याची नितांत गरज आहे. आपल्या जिवापेक्षा मोठे काहीही नाही हे सर्वांनी लक्षात घ्यावे. अतिउत्साह जीवावर बेतू शकतो याचे भान नागरिकांनी ठेवावे. असे भान जर नागरिकांनी ठेवले आणि प्रशासनाने गर्दीचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे केले तर अशा दुर्घटना घडणार नाहीत आणि त्यात निष्पाप नागरिकांचा बळी जाणार नाही. आता झाले ते झाले पण किमान यापुढे तरी अशा दुर्घटना घडणार नाहीत याची खबरदारी प्रत्येकाने घ्यावी. या दुर्घटनेत जीव गमावलेल्या 11 क्रिकेट चाहत्यांना भावपूर्ण श्रद्धांजली! ■ ■

**भारतीय नारी झोपडीतील असो वा राजवाड्यातील, तिचे भाग्य हे फार वेगळे असते. आपल्या देशात जिथे स्त्रीला माता, भगिनी अगदी देवासमान पुजण्याची भाषा केली जाते, तिथेच अक्षरशः शेकडो, हजारो घरांमध्ये हीच स्त्री उंबरठ्याच्या बाहेरही पडू शकत नाही. पडलीच तर वाटेवर काचा असतात. एकीकडे कर्तृत्वाच्या भराऱ्या घेणाऱ्या महिलांची उदाहरणे झळकत असतात आणि दुसरीकडे त्याच देशात कोळपून गेलेल्या लाखो महिलांकडे कुणाचे लक्षही नसते. महिलांच्या बाबतीत हे जळजळीत वास्तव आहे. तसे पाहता स्त्रीया नैसर्गिकरीत्या जरा जास्त भावनिक असतात.**

# भावनिक बुद्धिमत्ता

पण इतक्या भुमिका बजावत असतांनाही किती समतोल ठेवावा तिने. तिच्या भावना कोणी समजून घेऊच नये का? हे सुध्दा तिचे एक अदृश्य बळच नव्हे काय? ती स्वतःच्या भावना सांभाळून इतरांच्याही भावनांचा आदर करते. कारण तिच्या प्रत्येक निर्णयात आणि नात्यात सकारात्मक बदल घडवून आणू शकते. नात्यांच्या यशासाठी खूप महत्त्वाचे ठरते ते. समजा कुटुंबात सततचे वाद, भांडणे, मुले, नवरा, सासू-सासरे ही नाती सांभाळतांना तिची भावनिक समज ठीक नसली तर, सारे घरच विस्कळीत होईल. ती स्वतःच स्वतःच्या भावना सांभाळून वादविवाद, भांडणा ऐवजी शांतपणे, समजूतदारपणे निर्णय घेण्याची क्षमता ठेवते. गोंधळातही स्वतः शांत राहून इतरांना आधार देते. जुने झालेल्या गोष्टी मनात न ठेवता इतरांना माफ करण्याची क्षमताही तिच्यातच आहे. ती स्वतःचे आत्मनिरीक्षण करून, स्वतःचा विचार न करता, स्वतःला दुसऱ्याच्या जागी ठेवून सारासार विचार करते. संवादामध्ये सकारात्मकता ठेवते 'तुम्ही माझे कधीच ऐकत नाही याऐवजी आपण थोडे शांतपणे बसून बोलूया का?' असा सकारात्मक संवाद साधून मार्ग काढते. तिची भावनिक समज आणि बुद्धीमत्ता स्त्रीयांसाठी एक जीवन कौशल्य आहे. असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. कारण ती फक्त घर सांभाळत नसते तर संपूर्ण कुटुंबाच्या भावनिक गरजाही सांभाळणे ती तिची जबाबदारी समजते. जग कितीही बदलले, शिक्षण, कौशल्य, तांत्रिक ज्ञान यांचे महत्त्व कितीही वाढले, परंतु भावनिक बुद्धिमत्ता जिच्याकडे आहे, तीच घराची खरी शांती, प्रेम आणि एकजुट, तिच्या समजुतदार पणावर उभी असते. तिच्या भावना ओळखून समोरच्यानेही तिचे भरलेले डोळे पुसण्यासाठी कधी तरी पुढाकार घ्यावा. तिच्याही भावनांचा आदर करावा. तुम्ही नैराश्येत दिशा तिच्या मनात भावनांची कालवा कालव सुरू होते. अशीच आपली असणारी ती सहजासहजी मिळत नाही. नुकताच डॉ. लिना निकम यांचा चहा दिनानिमित्तचा लेख वाचण्यात आला. साधा चहा पण त्या मागच्या भावना बरंच काही सांगून गेल्या. अशा प्रकारे एकमेकांच्या भावना ओळखल्या की जीवनाची दिशा बदलते. मग चुक काय बरोबर काय याचा जास्त विचार होत नाही. खरे तर भावना ओळखायला मन शुद्ध आणि मोकळे असावे लागते. नाहीतर मग जुनी लोक म्हणतात तसे 'पदरी पडले पावन झाले' या म्हणीप्रमाणे संसाराचा गाडा हाकलत राहणे म्हणजे जीवन जगणे नव्हे. भावना जपल्या की त्याच भावना आपलेपणाची शिकवण देऊन जाते. म्हणूनच नात्यांमध्ये ह्या भावना जपण्यासाठी प्रयत्नशील असूया. ■ ■






मंदाकिनी काकडे,
मो.86000 17963

## वाचकांचे विचारपिठ

बहुजन सौरभ

### मासिक पाळी आणि अंधश्रद्धा

आज आपण एकविसाव्या शतकात सोशल मीडियाच्या आभासी जगात जागतिकीकरणाच्या वेगात जगतो. परंतु आजही मासिक पाळीविषयी समाजामध्ये अनेक गैरसमज आहेत. अजूनही एका मुलीला, एका स्त्रीला मासिक पाळी आली की घरात कुजबूज होते. आवाज दबवले जातात. वयात आलेल्या प्रत्येक मुलीला महिन्याला मासिक पाळी येते. मासिक पाळी ही स्त्रियांच्या जीवनातील एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. परंतु समाजामध्ये मासिक पाळीविषयी अनेक गैरसमज आणि अंधश्रद्धा आहेत. आजही काही घरामध्ये पाळी आलेल्या स्त्रीचा विटाळ मानला जातो. तिला चार दिवस घराच्या बाहेर ठेवले जाते. तिचा तिरस्कार केला जातो. एक स्त्रीच दुसऱ्या स्त्रीची वेदना समजून घेत नाही. पुरुष मंडळी तर याविषयी बोलायलाच टाळतात. एकीकडे स्त्रीला लक्ष्मीचे रूप मानून पुजले जाते आणि पाळीमध्ये तिचा तिरस्कार करून विटाळ मानतात. ही कुठली मानसिकता आहे. आजही बऱ्याच धर्मामध्ये स्त्रिला मासिक पाळीच्या काळात अपवित्र मानले जाते. मंदिरामध्ये प्रवेश दिला जात नाही. आधुनिक काळातही मासिक पाळी संदर्भात समाजात इतकी अंधश्रद्धा का आहे, याचा विविध अनुषंगाने विचार होणे आवश्यक आहे. दुसरीकडे आपण म्हणतो की, आजची स्त्री पुरुषांच्या बरोबरीने काम करते आहे. दोघांमध्ये कोणताही भेदभाव नाही. खरच एक स्त्री म्हणून तिला पुरुषाऐवढे अधिकारी आहेत का? संविधानाने स्त्रीला समानतेचा अधिकार दिला असला तरीपण समाजामध्ये तिला आजही दुय्यम वागणूक दिली जाते. माणूस शिक्षणाने शिक्षित झाले असले तरी जुन्या रूढी, अंधश्रद्धा पाळून विचाराने मानसिक गुलामच आहेत यावरून सिद्ध होते. बायबलमधील स्त्रिया त्यांच्या पाळीच्या काळात एकत्र येतात. बोलतात, हसतात, एकमेकींची काळजी घेतात. कारण त्यांच्यासाठी ती विश्रांतीची वेळ असते.हे चित्रण आपल्याला शिकवुन जातं की पाळी म्हणजे अडथळा नव्हे तर स्त्रीची विश्रांतीची वेळ आहे. एका पालकाने मुलीला पहिल्यांदा पाळी आली म्हणून ती केक कापून साजरी केली. त्यांच्याकडून शिकायला पाहिजे. शाळांमध्ये मुलींना पाळी ही लाज नव्हें तर सन्मान असतो. हे शिकवायला हवे. मासिक पाळी ही प्रत्येक स्त्रीला मातृत्वासाठी मिळालेला एक वरदान आहे. हे सांगितले पाहिजे. तेव्हा एक स्त्री, एक मुलगी स्वतःला कमी न समजता सक्षम आणि सुंदर समजेल. ■ ■

– प्रिती खोब्रागडे

# जेम्स प्रिंसेप आला नसता तर भारताचा इतिहास कळला नसता




जेम्स प्रिंसेप चे वडील मि. जॉन व आई सोफियाचे 10वे अपत्य (पुत्र) होते. जेम्सचा जन्म 1799 ला झाला होता. वडील 1771 मधे ईस्ट इंडिया कंपनी मार्फत एक अधिकारी होते. भारताची अवस्था बघून त्यांनी पुत्र जेम्सला हि ईस्ट इंडिया कंपनीत नौकरी करीता भारतात पाठविले होते. ब्रिटिश इंडियाची राजधानी 'कलकत्ता' टकसालीत असेस मास्टर (परख अधिकारी) पदावर जेम्स नि शुरुआत केली. मूलतः तो सिव्हिल इंजि./आर्किटेक्ट होता. वर्ष भरात तो वाराणसी चौकीच्या टकसालीत स्थानांतरित झाला. त्याच्या कामाची प्रगती बघून पुन्हा कलकत्ता टकसालीत पदोन्नती घेऊन आला. कार्य करीत असतांना नवे-नवे प्रयोग तो करत होता. त्यांनी नवीन उपकरण तयार केले. टकसालीच्या प्रचंड मोठ्या भट्टीतील अचूक तापमान मोजणारे उपकरण व 0.19 ग्राम धातूचे वजन करणारा तराजू सारखे अनेक उपकरण तयार केले होते. तो प्रामाणिक वैज्ञानिक होता.

वाराणसीत असतांना तिथल्या मोठ मोठ्या पुरातन इमारतीच्या कलाकृत्या बघून तो अचंभित झाला. त्यांच्या दुरुस्तीचे कार्य त्यांनी संपादित केले होते. कलकत्याला येऊन त्याने पुरातन नाणे संशोधनावर फोकस केला. त्याला एशियाटिक सोसायटीचे संपादक बनविण्यात आले. त्यांनी भारतातील हवामान बदल, पर्यावरणावर परिणाम व खनिज परीक्षण, रसायन शास्त्र, प्राचीन वास्तुकला, टकसाल शिक्के (नाणे) यांचा शोध घेणे आरंभ केले. या निमित्त शिक्यावरचे अक्षर परख प्रयत्न सुरु झाले. यापूर्वी पुरातन अक्षर संशोधन कोणीच केले नव्हते. शिक्क्यावरचे अक्षर अलाहाबादच्या स्तंभावरचे अक्षरात काही तरी साम्यताच्या खुणा मात्रात एकरूपता नजरेत आली. एशियातील काही ठिकाणी पाषाणावरचे कोरलेले लेख त्यांचे ठसे बिहार मधील बेतिहा स्थलाचे लेख व त्यांचे ठसे (छाप) एकत्रित करून भारतीय विद्वान पंडितांना विचारपूस केली. त्यांचे उत्तर नकारात्मक होते.

1838 मधे सर्व शिलालेखात शेवटचा शब्द 'दान' सामान्य दिसला आणि सुरुवातीचा शब्द 'देवानंपिय पियदस्सी' हा शब्द कॉमन दिसला. सिंहलच्या राजाचे नाव देवानपिय होते, म्हणून ते सिंहल देशात गेले. परंतु कार्बन डेटिंग मिळत नव्हती. तिथे महावंश ग्रंथात हे नाव लिहले आहे. त्यांनी 6 आठवडेपर्यंत संशय दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे मित्र जॉर्ज टर्नरने श्रीलंकेतील पाली भाषेतील संदर्भ दिले. 1915 मधे मास्की (कर्नाटक) च्या शिलालेखात 'असोक' हे नाव सापडले. तसेच गांधार (पाकिस्तान/अफगाण) पुरा. उत्खननातही असोक शब्द सापडला. यावरून सिद्ध झाले देवानंपिय पियदस्सी भारताचा सम्राट अशोक महान हाच आहे.

जेम्स प्रिंसेप नि इथून उडान घेतली. जिथे जिथे पुरातात्विक स्थळ, टीले, परिसर ओळखले, त्याचे उत्खनन करून शिलालेखात काय लिहले आहे, ते शोधन कार्य आरंभ केले. शिलालेखाची भाषा ब्रम्ही व लिखाई खरोष्ठीची पूर्ण वर्णमाला त्यांना अवगत झाली. हि अक्षरी वर्णमाला सगळीकडे प्रसारित केली. सारे पुरा. वेत्ता शिलालेख वाचून इतिहास प्रसारित करू लागले. त्यात सम्राट अशोकाची महानता जगा समोर आली. स्तंभ लेख षष्टम् वरून ई.पू. 269 ला सम्राट अशोक पदारूढ झाले आणि ई.पू. 257 पासून शिलालेख उत्कीर्ण करणे आरंभ झाले. स्तंभ लेख व भित्त शिलालेख आणि गुफा शिलालेख उत्कीर्ण आरंभ झाले. त्यात प्रजा कल्याण धम्म आचार, वृद्ध, बीमार आणि प्राणी यांची सेवा करण्याची त्यांनी अपेक्षा केली. उदा. 1) चंद्रपूर देवटेक (चिकम्बरा) च्या चिंचिच्या झाडाखाली सापडलेल्या विशाल दगडावर सम्राट लिहतो, अपरांत व महारट्ठचे रट्ठ, भोज व पैतनिक लोकांमधे नीतिमत्ता व धम्माचरण अति उत्तम आहे. हा शिलालेख सध्या नागपूरच्या अजब बंगला संग्रहालयात प्रदर्शनात आहे. उदा. 2) गांधार (अफगान) च्या जलालाबाद पासून 25 कि.मी. वर हड्डा (महारवाकोट) पुरा. क्षेत्रात पुरावेत्ता टी. ओसले ला विशाल बुद्धमूर्तीचा साठा सापडला. त्यात एका शिलालेखावर 'देवानंपिय पियदस्सी असीतस्सी साकिया बुद्ध' उत्कीर्ण आहे. यावरून सिद्ध झाले कि सम्राट अशोक शाक्यवंशी बौद्ध उपासक होते. अशा प्रकारचे अनेक शिलालेख भारताच्या कान्या कोपऱ्यात आढळतात. जेम्स प्रिंसेप रोज 18-20 तास या उपक्रमात गुंतलेले असत. त्यांना डोके दुखीचा आजार झाला. त्या उपचारा करीता त्यांना इंग्लंडला जावे लागले. दि. 22 एप्रिल 1840 ला त्यांचे निधन झाले. कलकत्ता शहरात हुगळी नदीकाठी त्यांच्या स्मरणार्थ 'प्रिंसेप घाट' निर्मित केला आहे. एशियाटिक सोसायटीने त्यांचा अर्धकृती पुतळा स्थापित केला आहे. इंग्लंडमधे त्यांच्या नावावर पुरस्कार (मेडल) बनविले आहे. जॉन राइले जीवशास्त्रीनी एक झाडाच्या प्रजाती चे नाव प्रिन्सेपिया, त्यांच्या नावावर ठेवले आहे. प्रिंसेपच्या चौथ्या पीढीचे (वारस) मुलांनी जेम्स प्रिंसेपचे सारे हस्तलिखित पेटारे भारताच्या ए.एस.आई. ला दिले आहे. संपूर्ण आयुष्य जेम्स प्रिंसेप नि शिलालेखाची भाषा (वर्णमाला) ओळख शोधण्यात घालवली होती. हा प्रयत्न त्याग त्यांनी केला नसता तर आम्हाला प्रामाणिक सम्राट अशोक आढळला नसता. म्हणूनच भारताच्या प्रामाणिक इतिहासाचे जनक जेम्स प्रिंसेप ठरतात. पुढे त्यांची शृंखला पुरावेत्ता जन. अलेक्झांडर कनिंघम, जे.डी. बेगलर, जॉन डेविड, टी. ओसले, सर कंजीस, जॉन मार्शल, डब्लू.सी. पेपे या सर्वांनी निरंतर चालू ठेवली. त्या करता ए.एस.आई. ची स्थापना केली. या अंतर्गत 1) गिरनार चतुर्दशी शिलालेख. 2) गिरनार द्वितीय शिलालेख असे एकंदरी 14 शिलालेख सापडले. 3) कालसी चे 14 शिलालेख, त्यात हत्ती चित्र त्यावर गजतम लिहले आहे. हे बुद्धाच्या जन्मा संबंधी प्रतीक आहे. 4) शाहबाज गढी चे 14 शिलालेख. 5) मानसेहरा चे 14 शिलालेख. 6) एर्रागुडी चे 14 शिलालेख. 7) जौगड (धौली) चे 14 शिलालेख.



धम्मपाल देशभ्रतार
मो. 9131422581

1) स्तंभ लेख दिल्ली (टोपारा) चे 7, दिल्ली मेरठ इथे 6 स्तंभ लेख. 2) लोहिया (अराराज) इथे 6 स्तंभ लेख. 3) लौडिया (नंदनगड) इथे 6 स्तंभ लेख. 4) रामपूरवा (बिहार) इथे वृषभ स्तंभ व 6 स्तंभ लेख. 5) इलाहाबाद (कोसांबी) इथे 7 स्तंभ लेख व आठव्या स्तंभ लेखावर सम्राटाची रानी 'कालुवाकी' व त्यांचा पुत्र 'तिवरदेव' हे नाव अंकित आहे. 6) सांची, सारनाथचे लघु स्तंभ शिलालेख. 7) रुम्मनदेई (लुम्बिनी) लघु स्तंभ शिलालेख. 8) निग्लीवाचा लघु स्तंभ शिलालेख. 9) गुजर्रा (रूपनाथ) म.प्र., ब्रम्हगिरी, वैराठगढ (राजस्थान), गविमठ, मास्की, पालकी कुंड, राजुर मंदागिरी, जटिंग, रामेश्वर, सिद्धपूर (कर्नाटक), करंडक शिलालेख पिपरवाहा, सोपारा, कंधार, गया (बिहार), गुहालेख-न्यग्रंध, स्खलतिक पर्वत, बराबर पहाडी (बिहार) इत्यादी महत्वपूर्ण शिलालेखाचे वाचन जेम्स प्रिंसेपच्या अथक प्रयत्नामुळे संभव झाले. जगाला हि अनमोल भेट जेम्स प्रिन्सेप मुळे लाभली. म्हणूनच ते भारताच्या खऱ्या इतिहासाचे जनक सिद्ध झाले. ■ ■

## महत्वाचे

### बसपा तर्फे वृक्षरोपण



**नागपूर :** बहुजन समाज पार्टीने 'कही हम भूल ना जाये' या राष्ट्रीय अभियान अंतर्गत विश्व पर्यावरण दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्र प्रदेश बसपाचे मीडिया प्रभारी उत्तम शेवडे व नागपूर जिल्हा महासचिव चंद्रशेखर कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत बॅनर्जी लेआउट येथील कैकाडी महाराज उद्यान परिसरात दोन बोधीवृक्षाचे वृक्षरोपण केले. बोधीवृक्ष हा 24 तास ऑक्सिजन देणारा वृक्ष असल्याने या वृक्षाचे रोपण केल्याचे उत्तम शेवडे यांनी सांगितले. याप्रसंगी नितीन वंजारी, दिलीप गजघाटे, जगदीश गेडाम, संभाजी लोखंडे, शामराव तिरपुडे, भाऊराव नगराळे, गौतम मून, छाया सोमकुवर, हनुमान उके, प्रेम गोटे, तथागत कांबळे, आस्था शेवडे, स्वरा भिष्णूकर आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

### बार्टी संस्थेत बोधीवृक्षांचे रोपण



**पुणे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे जागतीक पर्यावरण दिनानिमित्त मुख्यालयातील गार्डन मध्ये महासंचालक सुनील वारे यांच्या हस्ते बुद्धगया येथून आणलेल्या बोधीवृक्षांचे रोपण करण्यात आले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महासंचालक वारे यांनी शुभेच्छा देतांना आपण पर्यावरणाचा समतोल राखला पाहिजे, तसेच प्रत्येकांनी एक झाड लावून त्यांचे संगोपन व जोपासले पाहिजे अशा आशावाद व्यक्त केला. यावेळी विभागप्रमुख अनिल कारंडे, शुभांगी पाटिल, कार्यालय अधीक्षक डॉ. संध्या नारखेडे, सचिन जगदाळे, प्रकल्प व्यवस्थापक नसरिन तांबोळी, सुमेध थोरात, डॉ. सारिका थोरात, शुभांगी सुतार, आरती जाधव, रामदास लोखंडे, अमोल राऊत (माळी) यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### जागतिक पर्यावरण दिवस साजरा



**नागपूर :** वंचित बहुजन आघाडीच्या वतीने इंदोरा स्थित शासकीय उच्चस्तर औद्योकिय प्रशिक्षण संस्था येथे वृक्षारोपण करण्यात आले. जागतिक पर्यावरण दिवस साजरा करण्यात आला. उत्तर नागपूर मधील सर्व वरिष्ठ पदाधिकारी मुरलीधर मेश्राम, हरिश नारनवरे, गोवर्धन भेले, विजय खोब्रागडे, आनंद चवरे, तसेच वंचित बहुजन महिला आघाडीच्या अध्यक्षा वर्षा धारगावे, अनिता जनबंधु, विशाखा लोखंडे, पदाधिकारी आणि भारतीय बौद्ध महासभा पंचशिला साहारे, गीता जांभुळकर, रमा सोमकुवर, साधना सोमकुवर, रमा टेंभुर्णे, संध्या व सर्व इंदोरा आय टी आय शाखेतील वालदे, बाहुले आदी उपस्थित होते.

### कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समितीच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष प्रिती राजेंद्र शेगोकार यांची नियुक्ती



**मुंबई :** भीमा कोरेगाव विजयस्तंभ विकासासाठी सरकार अनेक वेळा निधीची घोषणा करीत असले तरी भीमा कोरेगाव विजयस्तंभ अतिक्रमण व जागेचा मालकी हक्क हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याने कसलाही विकास करता येणार नाही. म्हणून प्रथम न्यायालयाचा खटला जिंकणे ही आपली सर्वांची सामुहिक जबाबदारी आहे. भीमा कोरेगाव विजयस्तंभ अतिक्रमण व जागेचा मालकी हक्क हा प्रशासकीय व न्यायालयीन लढा प्रत्येक गावात, शहरात, तालुक्यात, जिल्ह्यात, राज्यात व राष्ट्रीय पातळीवर जनजागृती करण्यासाठी व हा लढा समाजभिमुख व्हावा म्हणून जनजागृती अभियान राबवण्यात येणार आहे. न्यायालयाचा खटला गतिमान व्हावा आणि लवकरात लवकर निकाल लागावा म्हणून या लढ्यात सर्वांनी सहभागी व्हावे. म्हणून कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समिती स्थापन करण्यात आलेली असून कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समितीचे अध्यक्ष दादाभाऊ अभंग यांनी कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समितीच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष व बुलढाणा जिल्हा (महिला) प्रभारी या पदावर माजी नगरसेविका प्रिती राजेंद्र शेगोकार यांची नियुक्ती करण्यात आली असून त्या मागील अनेक वर्षांपासून आंबेडकरी चळवळीत कार्यरत आहेत.

# तांदूळ घोटाळ्याची जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी घेतली गंभीर दखल

**चंद्रपूर :** शेतकऱ्यांकडून आधारभूत धान खरेदी योजनेतंर्गत खरेदी केलेले धान व गिरणीधारकांकडून प्रत्यक्षात भरडाई केल्यानंतर शासनाला पुरवठा होत असेलल्या तांदळाच्या साठ्यात तफावत आढळून आल्याने जिल्ह्यातील तांदूळ घोटाळ्याचे बिंग फुटले. जिल्हा मार्केटिंग अधिकारी व धान गिरणी मालकांच्या हातमिळवणीतून सुरू असलेल्या या घोटाळ्याची जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी गंभीर दखल घेतली आहे. याप्रकरणी तातडीने वस्तुनिष्ट अहवाल सादर करा, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा मार्केटिंग अधिकारी व्ही.एस. तिवाडे यांना दिले आहेत. त्यामुळे धान गिरणी मालक व अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत धान्य खरेदी, पुरवठा साखळी व्यवस्थापन, साठवणुक क्षमता, अन्नधान्याचे वितरण, आदी बाबींचा अभ्यास करण्यासाठी अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या उपसचिव राजश्री सारंग व इतर अधिकाऱ्यांमार्फत 1 जूनला कांपा (ता. नागभीड) येथील गुप्ता राईस एक्स्पोर्ट व चांदतारा इंडियन स्टीम राईस इंडस्ट्रिज, या दोन गिरण्यांवर छापे टाकले.



जिल्ह्यात या दोन गिरण्याच नव्हे, तर इतर अनेक धान गिरण्यांमधून मोठ्या प्रमाणात अनियमितता करण्यात आल्याचा संशय आहे. याची दखल घेत जिल्हाधिकारी यांनी जिल्हा मार्केटिंग अधिकारी तिवाडे यांना या प्रकरणाची सविस्तर माहिती द्या, असे निर्देश दिले होते. मात्र, जिल्हा मार्केटिंग अधिकारी माहिती देण्यास टाळाटाळ करीत होते. अखेर जिल्हाधिकारी गौडा यांनी स्वतः मार्केटिंग अधिकारी तिवाडे यांना फोन करून तांदूळ खरेदी प्रकरणाचा अहवाल तत्काळ सादर करा, अन्यथा कारवाई करू, असा इशारा दिला.

यासंदर्भात जिल्हाधिकारी यांना विचारणा केली असता, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून वरिष्ठांना अहवाल सादर करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा मार्केटिंग अधिकारी तिवाडे यांनी यासंदर्भात आकडेवारी दिली आहे. शासकीय आधारभूत धान खरेदी योजनेंतर्गत हंगाम 2024-25 मध्ये खरेदी करण्यात आलेल्या धान साठापैकी गुप्ता राईस एक्स्पोर्ट या गिरणी धारकास 21099.92 क्विंटलचे जिल्हा मार्केटिंग अधिकारी कार्यालयामार्फत शासनाच्या 'बीम पोर्टल'द्वारे 'डीओ' देण्यात आले. त्यापैकी प्रत्यक्षात 230373.68 क्विंटल धानाची उचल करून 726 क्विंटल घट वजा करता संपूर्ण 'डीओ' 'बीम पोर्टल'वर ऑनलाइन करण्यात आले आहे. प्रत्यक्ष उचल करण्यात आलेल्या धानाच्या 67 टक्के प्रमाणे 13650.37 क्विंटल 'सीएमआर' तयार होते. त्यापैकी 5206.60 क्विंटल धान शासकीय गोदामात जमा करण्यात आले व उर्वरित जमा करणे सुरू आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, ते केवळ आकडेवारीचा खेळ खेळत असल्याची चर्चा जिल्ह्यात सुरू आहे.





## रमाई बुद्ध विहार

बुद्धरत्न महिला मंडळ, श्रीरामनगर, मानेवाडा रिंग रोड, दक्षिण नागपूर विहारामध्ये नियमित वंदना, पौर्णिमा, जयंती, वर्षावास मध्ये बुद्ध ग्रंथ वाचन होते. महिला मंडळच्या सदस्य, अन्नपूर्णा वानखेडे (7821803818) कर्वे (9673548886) सरीता कांबळे, रंजना गायकवाड, रोशनी मंडपे विहाराचे नियोजन करीत आहेत.

संवाद मित्र, डी.आर. कांबळे
मो.8600924170

## महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचे नातू आनंदराज आंबेडकर यांची बार्टीला भेट

**पुणे :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने असलेली (बार्टी) ही महाराष्ट्र शासनाची महत्वपूर्ण संस्था असुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक समतेचा विचार व भारतीय संविधानाचा प्रसार व प्रचार करत असुन अनुसूचित जातीच्या उत्थानासाठी काम करते. बार्टीने विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व कौशल्य विकास तसेच माहिती तंत्रज्ञान आयआयटी क्षेत्रातील प्रशिक्षण देऊन विद्यार्थी घडवावेत असे मत विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांनी बार्टी संस्थेस बोलताना व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथील मुख्यालयात दिनांक 5 जून रोजी त्यांनी सदिच्छा भेट दिली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले. बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे यांनी त्यांना 'महामानव' हा ग्रंथ व पुष्पगुच्छ भेट देऊन सन्मानित केले. यावेळी महासंचालक यांनी बार्टी संस्थेतील विविध योजनाची माहिती दिली. नुकतेच बार्टीतील 11 विद्यार्थी हे क्लस्ट व 2 विद्यार्थी भारतीय नागरी सेवेत उत्तीर्ण झाले तसेच 19 विद्यार्थी जेईई ॲडव्हान्स परिक्षेत उत्तीर्ण होऊन द्विद्वज्ञ मध्ये प्रवेश निश्चित केला आहे आणि 22 हजार विद्यार्थी हे वेगवेगळे प्रशिक्षण घेत आहेत. माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या जिवनातील अनेक पैलू बार्टी रमाई प्रकल्पाद्वारे संशोधन करत असल्याचे सांगितले. आनंदराज आंबेडकर यांनी बार्टीतील योजनांची माहिती घेऊन महासंचालक वारे यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या. विभागप्रमुख दादासाहेब गिते, अनिल कारंडे, रिपब्लिकन सेनेचे संजय बावधानकर, विवेक बनसोडे, युवराज बनसोडे, हनुमंत पपुल, विशाल मस्के, कमलेश चाबुकस्वार, मालोजी भेदेकर यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक रामदास लोखंडे यांनी केले.



## माफसूच्या संचालनालय विस्तार शिक्षण येथे वृक्षारोपण

**नागपूर :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरच्या संचालनालय, विस्तार शिक्षण आणि शेतकरी भवन परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. सर्वत्र मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असुन त्याचा परिणाम तापमानावर दिसुन येत आहे. या वर्षी तापमान हे 45 ते 47 अंशावर गेले असुन या पुढे तापमानात दिवसेंदिवस वाढ होणार आहे. 'झाडे लावा, झाडे वाचवा' ही काळाची गरज आहे, म्हणून वेळीच वृक्ष लागवडीचे महत्व समजून घेऊन मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करुन संवर्धन करणे गरजेचे आहे. या प्रसंगी संचालक, विस्तार शिक्षण डॉ. अनिल भिकाने, तांत्रीक अधिकारी डॉ. सारीपुत लांडगे, कास्ट्राईब महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे (नागपूर शाखा) उपाध्यक्ष प्रवीण बागडे, सचिव जितेंद्र हातमोडे, मोहन कापसे, अतुल जाधव, राजेश गहलोद आणि स्वप्नील दाते ई. प्रामुख्याने उपस्थित होते.



## महावितरणचा 20 वा वर्धापन दिन उत्साहात, कर्मचाऱ्यांनी घेतली सुरक्षेची शपथ!





**नागपूर :** 'माझ्या कौटुंबिक जबाबदारीचे व्यवस्थित निर्वहन करण्यासाठी, विद्युत सुरक्षिततेशी मी कधीही तडजोड करणार नाही' या सुरक्षा प्रतिज्ञेने महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी 20 वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. नागपूर परिमंडलातील विविध कार्यालयांमध्ये हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला, जिथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या 351 व्या राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त त्यांच्या अर्धाकृती पुतळ्याला आदराने अभिवादन करण्यात आले. हा दिवस केवळ वर्धापन दिनापुरता मर्यादित नसून, सुरक्षिततेच्या संस्कृतीला अधिक बळकट करण्याचा संकल्प घेऊन साजरा करण्यात आला.यावेळी महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) अतुल राऊत, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, कार्यकारी अभियंता मंजूषा आडे यांच्यासह महावितरणच्या प्रादेशिक व परिमंडल कार्यालयांमधील विविध विभाग प्रमुख, अधिकारी, अभियंते तसेच महानिर्मिती आणि महापारेषण कंपन्यांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुरुषोत्तम खेडेकरांनी मराठा समाजाचे कान टोचले

**ज्यांच्याकडे अतिरिक्त काळा पैसा आला त्यांनी समाज बिघडवला.**

**जो मोठे लग्न करेल, लग्नात अवाढव्य खर्च करेल, त्यांच्या लग्नाला जाऊ नका!**

**समाजात जो श्रीमंती दाखविण्याचा माज आलाय तो संपवावा लागेल.**



**सिंदखेडराजा :** भारताच्या संविधानाचे यंदा अमृत महोत्सवी वर्ष आहे. माझेही अमृत महोत्सवी वर्ष आहे. आज अनेक जण हातात सोन्या चांदीचे चमचे घेऊन जन्माला आले, मात्र मी संविधान घेऊन जन्माला आलोय. जो मोठे लग्न करेन, लग्नात अवाढव्य खर्च करेन, भटजींना दक्षिणा देईल, त्यांच्या लग्नात जाऊ नये, अशी भूमिका घेण्याची वेळ आली आहे, अशा शब्दात मराठा सेवा संघाचे प्रमुख पुरुषोत्तम खेडेकर यांनी मराठा समाजाचे कान टोचले आहेत. ते सिंदखेड राजा येथे एका समारंभात बोलत होते. पुढे बोलतांना पुरुषोत्तम खेडेकर म्हणाले, ज्याच्याकडे अतिरिक्त काळा पैसा आहे अशा लोकांनी समाज बिघडवला आहे. कुठल्याही पक्षात रहा पण जुन्या परंपरा रूढी बंद करा. एका ताटात जेवणारे आम्ही लोक होतो. यात विष कुणी कालवते, याचा शोध घेणे गरजेचे आहे. कुणीतरी जातीयतेचे विष पेरत आहे, हे सर्वांनी लक्षात घ्यावे. आपल्यापैकी कुणी राष्ट्रपती, प्रधानमंत्री झाले तरी मराठा समजाचे एका रात्रीतून बरे होणार नाही, असेही ते म्हणाले. खेडेकर म्हणाले, आज तुम्हाला आरक्षण मिळाले तरी तुम्हाला उद्याच नोकरी मिळेल असे नाही. अनेक छोटे-छोटे समाज आपल्या कर्तृत्वावर मोठे झाले आहेत. हे श्रीमंत लोक अगदी साधे लग्न करतात. आपल्यात (मराठा समाजात) जो माज आहे तो संपवण्याची जवाबदारी मराठा सेवा संघाने घ्यावी.

### समाजातील अनिष्ट चालीरिती नष्ट करा

अनिष्ट चालीरीती, रूढी परंपरा आता नष्ट करण्याची वेळ आली आहे. यावेळी खेडेकरांनी मराठा समाजातील अनेक अनिष्ट चालीरीती, रूढी परंपरांचा उल्लेख केला आणि त्यामुळे सर्वांनी समोर आले पाहिजे. यासोबतच त्यांनी 2026 चा जिजाऊ जन्मोत्सव हा महिलांनी महिलांसाठी साजरा करण्याचे आवाहनही केले. यावेळी मंचावर केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधवांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

आपल्या कुटुंबातील मुली-मुलांना या सगळ्या गोष्टी शिकविण्याची वेळ आली आहे. मराठा हा व्यापक शब्द असला तरी प्रत्येकाने स्वतःहून उभे राहणे शिका. कुणीतरी येईल आणि तुमचे कल्याण करेल ते दिवस आता संपले आहेत. आपण म्हणतो की आम्ही सहा कोटी आहोत, दररोज तुम्ही एक रुपया जमा केला तर दररोज सहा कोटी आणि महिन्याला 1800 कोटी जमा होतील. मात्र दुर्दैवाने आमचा मराठा समाज देणारा नाही तर घेणारा होत चालला आहे, अशी खंत देखील पुरुषोत्तम खेडेकर यांनी व्यक्त केली.

## आसमान फाउंडेशन तर्फे अंगणवाडीच्या मुलांना काउंटिंग स्लेटचे वितरण





**नागपूर :** आसमान फाउंडेशन तर्फे नवीन शिक्षण सत्रात अंगणवाडीच्या गरीब, आदिवासी छोट्या मुलांसाठी काउंटिंग स्लेट वितरण समारंभ आदिवासी क्षेत्र चमेडिया, काछिपुरा, रामदासपेठ येथील अंगणवाडी केन्द्र क्र.106 व पोलीस चौकी, काछिपुरा येथील अंगणवाडी केन्द्र क्र. 105 येथे आयोजित केला गेला. यावेळी मुलांना खाऊ वितरित करण्यात आला. कार्यक्रमात लायन्स क्लब माऊली, नागपूर यांचा विशेष सहयोग होता. आसमान फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. रवि गिऱ्हे यांनी एनजीओचे विविध सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमात फाउंडेशनचे सचिव नरेश शेंडे, कोषाध्यक्ष उषा जैन, संचालक दिनेश टेकाडे, आसमान महिला क्रेडिट सोसायटी अध्यक्ष मेघा गिऱ्हे, पायल काळे, लायन्स क्लब माऊली नागपूरचे रिजन चेअर पर्सन डॉ. अरविंद बुटले, अशोक अंबरते सदस्य, शेखर धोटे सदस्य उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी बिरसा मुंडा विचार मंचचे संयोजक सुनील उईके, अंगणवाडी 106 सेविका आशा गेडाम, सहायिका सुरेखा उईके, अंगणवाडी 105 सेविका जया वानखेडे, मिनाक्षी ठाकरे, अर्चना कनोजिया, बेबी चोटपगार, किरण ताम्हण वार्ड महामंत्री, अरुण मोगरकर वार्ड अध्यक्ष यांचे महत्वपूर्ण योगदान लाभले.

## जाहिरात



प्रॉपर्टी घेणे विकणे भाड्याने देणे अधिक माहिती करिता

संपर्क
९३२५६२९६३५

## निधन वार्ता

### लीलाबाई नारायण जगताप



**नागपूर :** लीलाबाई नारायण जगताप, वय 73, बालाजी नगर एक्स्टेंशन, यांचे निधन झाले. त्यांच्यावर शुक्रवार दि.6-6-25 ला मानेवाडा घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुली, दोन मुले, सुन, नातवंड बराच मोठा परीवार आहे.

## आजचे कार्यक्रम

### उद्घोष मैत्री संघ

दिनांक : 7/6/2025
वेळ : सकाळी 8 वाजता.
स्थान : कमाल टाकिज, कर्मवीर हरिदासजी आवळे स्मृती परिसर, आवळेबाबु चौक, नागपूर.
विषय :- नागपूर महानगरपालिका निवडणूक आणि झोपडपट्टीचे मालकी पट्टे.
मार्गदर्शक : अनिल वासनिक, अध्यक्ष, नागपूर सुधार समिती.



# पुसद येथे बनावट 500 च्या नोटांची छपाई

**यवतमाळ :** बनावट नोटा छापणाऱ्या टोळीतील चार जणांना अटक करण्यात पोलीसांना यश आले असून या टोळीकडून चार बनावट नोटांसह एक लाख 91 हजार 624 रुपयांच्या मुद्देमाल जप्त करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेने गुरुवारी गोपनीय माहितीच्या आधारे छापा टाकून ही कारवाई केली. राजकुमार श्रावण पारधी रा. सावळी ता. मानोरा जि. वाशिम सध्या रा. नवीन पुसद जि. यवतमाळ, तुकाराम दामाजी गुहाडे रा.हर्षी ता. पुसद, भाऊसाहेब आनंदराव पतंगे रा. कोंदूर ता. कळमनुरी जि. हिंगोली, रामदास किसन भरकाडे रा. डोणवाडा ता. वसमत जि. हिंगोली या आरोपींना अटक केली.

या टोळीतील साथीदार पंडीत भालेराव रा. शिवणी ता. कळमनुरी जि. हिंगोली हा फरार असून त्याला पकडण्यासाठी पोलीस पथक रवाना करण्यात आले आहे. या पाचही आरोपींविरुद्ध पुसद शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडून मिळालेल्या माहितीनुसार 5 जून रोजीच्या रात्री पेट्रोलींग करीत असताना गोपनिय बातमीदारामार्फत खात्रीशिर माहीती मिळाली की, नवीन पुसद येथील सोनू पाटील यांच्या भाड्याच्या रुममध्ये राजकुमार पारधी हा राहत असून त्याचेकडे काही संशयीत इसम आलेले आहे. ते 500 रुपये दराच्या बनावट चलनी नोट तयार करत आहेत.

या माहितीच्या आधारे नमूद पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी अतिशय शिताफिने नवीन पुसद येथील मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी घराच्या चारही बाजूने सापळा लावला. त्याने त्याचे नाव राजकुमार असे सांगून सध्या या घरात परिवारासह भाडयाने राहत असल्याचे सांगितले. त्याच्या समक्ष घरात प्रवेश केला असता घराच्या बेडरुममध्ये तीन इसम गोल रिंगन करुन त्यांच्या समोर व बाजूला 500 रुपये दराच्या चलनी नोटा, दोन वर्तुळाकार काच, तसेच 500 रुपयांच्या नोटाचे आकारचे कोऱ्या कागदाच्या बंडलच्या सहाय्याने वेगवेगळ्या कंपनीचे केमीकलच्या बॉटल व केमिकल मिश्रीत कागदाच्या सहाय्याने भारतीय बनावटीच्या चलनी नोटा बनवत असल्याचे आढळले.

पंचासमक्ष या 500 रुपये दराच्या नोटांची पडताळणी केली असता त्यांच्या ताब्यातील एकूण 117 नोटामध्ये 500 रुपये दराच्या चार नोटा बनावट असल्याचे दिसून आले. या प्रकरणी आरोपींना अटक करण्यात आली असून या प्रकरणाचा अधिक तपास शहर पोलिसांकडून केला जात आहे. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी तथा अतीरीक्त पोलीस अधीक्षक हर्षवर्धन बी.जे., पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनात गजानन गजभारे, शरद लोहकरे, मुन्ना आडे, संतोष भोरगे, सुभाष जाधव, कुणाल मुंडोकार, रमेश राठोड, तेजाब रणखांब, सुनिल पंडागळे, रविंद्र श्रीरामे, राजेश जाधव यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

सदर ठिकाणावरुन नोटाचे आकारचे कोऱ्या कागदाचे बंडल, वेगवेगळ्या कंपनीच्या केमीकलच्या बॉटल व केमिकल मिश्रीत नोटांच्या आकाराचे काळपट कागद, दोन गोलाकार काच तसेच 500 रुपयाच्या चार बनावट नोटा, तसेच 500 रूपयांच्या 113 चलनी नोटा व इतर साहित्य असा एकूण एक लाख 91 हजार 624 रूपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. यातील बहुतांश आरोपी मराठवाड्यातील आहेत. त्यामुळे या बनावट नोटांचे तर विदर्भासह मराठवाड्यात असल्याचे सांगण्यात येते.

## स्टुडिओ किरायाने देणे आहे



दैनिक बहुजन सौरभने एक उत्कृष्ट दर्जाचा स्टुडिओ तयार केलेला आहे. बेरोजगार विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याचा मोफत कोर्स करण्याचा मानस आहे. ज्या कोणाला नाटक, गाणी, कराओके किंवा फेसबुक रिलवर टाकणारी कोणतीही माहितीसाठी स्टुडिओचा वापर करायचा असल्यास तासाप्रमाणे भाड्याने देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.



मो. 8482839451

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648